दि.  २० फेब्रुवारी २०१९

# ठाणे महानगरपालिका ठाणे

# सन २०१९-२०२०

## महापालिका आयुक्त श्री.संजीव जयस्वाल यांचे
## अर्थसंकल्पाबाबत निवेदन

मा.सभापती स्थायी समिती व सन्माननीय सदस्य,

ठाणे महानगरपालिकेतील माझ्या कार्यकालातील ठाणे शहराला प्रगतिपथावर नेणारा पाचवा अर्थसंकल्प सादर करण्याचे मला सौभाग्य प्राप्त झाल्याबद्दल मला खुप आनंद होत आहे.

या अर्थसंकल्पामध्ये माझ्या गेल्या चार वर्षाच्या कालावधीत ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने जो संकल्प केला होता. त्याची पुर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला असल्याने मी या अर्थसंकल्पास **" संकल्पपूर्ती अर्थसंकल्प"** असे नाव दिले आहे.  मागील ४ वर्षातील कार्यपुर्तीचा फलनिष्पत्ती अहवाल सादर करण्यात येत आहे.

माझ्या जीवनामध्ये ठाणे शहराबाबत वेगळे स्थान निर्माण झाले आहे. याबाबत मी एवढेच म्हणेण

" मेरी सांसो पर नाम बसा तुम्हारा है।
मै अगर खुश हूं तो ये एहसान तुम्हारा है। "

या चार वर्षाच्या कालावधीमध्ये मी माझ्या परीने ठाणे शहराच्या विकासाकरीता १०० टक्के योगदान दिले आहे. या कालावधीत मला काही गोड तर काही कडू गोष्टींचा सामना करावा लागला. याबाबत मी एवढेच म्हणेन

" कारीगर हूँ साहब, अल्फजो की मिट्टी से महफिलों को सजाता हूं ....
किसी को बेकार, किसी को लाजवाब नजर आता हूं ...."

या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही कर वाढ प्रस्तावित नसून प्राप्त उत्पन्नाच्या स्त्रोतापासून जास्तीत जास्त वसुलीवर भर देऊन उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तसेच या अर्थसंकल्पात सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण विषयक व आरोग्यदायी योजना प्रस्तावित आहेत. मागील दोन आर्थिक वर्षात हाती घेण्यात आलेले संकल्प पूर्ण करण्यासाठी तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीचे प्रकल्प संपूर्ण देशामध्ये प्रथम राबविणारी महानगरपालिका अशी या शहराची ख्याती सर्वदूर होत आहे व यामध्ये ४ वर्ष घेतलेल्या मेहनतीचे फळ आहे असे मला अभिमानाने सांगावेसे वाटते. यामध्ये क्लस्टर योजना, अंतर्गत मेट्रो प्रकल्प, पीआरटीएस, अंतर्गत जलवाहतूक या प्रकल्पाचा प्रामुख्याने उल्लेख करणे मला उचित वाटते. अंतर्गत मेट्रो प्रकल्प एखादया महानगरपालिकेने पुढाकार घेवून राबविणे हे देशातील प्रथम उदाहरण आहे. तसेच पीआरटीएस व नाविन्यपूर्ण प्रकल्पाद्वारे वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी पुढाकार घेतला असून अंतर्गत जलवाहतुकीद्वारे मुंबई, नवी मुंबई, वसई यांना जोडणारा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी २ वर्ष घेतलेल्या मेहनतीस मूर्त स्वरुप प्राप्त होऊन प्रकल्प कार्यान्वित होत आहेत.

महापालिकेच्या आर्थिक विकासाचा पाया महापालिकेच्या उत्पन्नावर अवलंबून असतो. मागील ४ वर्षातील कार्यकालाचा आढावा घेतल्यास सन २०१४-१५ मध्ये सर्व स्त्रोतापासून रु.१६०६.२० कोटी उत्पन्न असलेल्या महानगरपालिकेस सन २०१८-१९ मध्ये रु.३२६५.६८ कोटी उत्पन्न प्राप्त होईल याचा अर्थ ४ वर्षामध्ये महापालिकेचे उत्पन्न १०३% वाढले आहे व सन २०१९-२० मध्ये सर्व स्त्रोतापासून **रु.३८६१.८८ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**मालमत्ता कर**

मालमत्ता करामध्ये सन २०१४-१५ चे उत्पन्न रु.२८३.६३ व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सुधारीत अंदाजे रु.५५७.५४ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. म्हणजेच उत्पन्नात ९७% वाढ आहे. सन २०१८-१९ साठी मालमत्ता कराचे शासकीय करासह उत्पन्न **रु.६०० कोटी**वरुन **रु.५५७.५४ कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये मूल्यनिर्धारण न झालेल्या मालमत्तांचे GIS सर्वेद्वारे मूल्यनिर्धारण करुन कराची आकारणी करण्यात येणार असल्याने मालमत्ता करात वाढ अपेक्षित आहे. सन २०१९-२० मध्ये मालमत्ता करापासून **रु.६५० कोटी** जमा अपेक्षित आहे. **मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्यासाठी पुढीलप्रमाणे सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.**

- सर्व संकलन केंद्रावर विना चार्जेस Debit / Credit कार्ड द्वारे व पेमेंट गेटवेद्वारे तसेच क्यूआर कोडद्वारे कर जमा करण्याची सुविधा.
- ऑनलाईन पद्धतीने कर जमा करीत असतांना काही मदत हवी असल्यास ऑनलाईन सेंटरची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.
- पहिल्या सहामाहीच्या मालमत्ता करासोबत दुस-या सहामाहीचा मालमत्ता कर जमा केल्यास दुस-या सहामाहीच्या सामान्य करात सूट
- डीजी ठाणे ॲपद्वारे मालमत्ता कर भरल्यास अतिरिक्त सवलत
- महाराष्ट्रात प्रथमच महापालिकेतर्फे मोबाईल व्हॅनची सुविधा.

**विकास व तत्सम शुल्क**

विकास व तत्सम कराचे सन २०१४-१५ मध्ये रु.२६९.६५ कोटी उत्पन्न होते ते सन २०१८-१९ मध्ये रु.७२२.६८ कोटी प्राप्त होतील असे अपेक्षित आहे. याचा अर्थ विकास व तत्सम करामध्ये १६८.०१% वाढ झाली आहे. सन २०१८-१९ साठी विकास व तत्सम शुल्कापासून मिळणारे उत्पन्न **रु.८८७ कोटी**वरुन **रु.७२२.६८ कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये सुविधा भूखंड/ आरक्षित भूखंड पुनर्खरेदी उत्पन्न नव्याने प्राप्त होणार असल्याने विकास व तत्सम शुल्कापासून **रु.९२४ कोटी** जमा अपेक्षित आहे.

**वस्तू व सेवाकर अनुदान**

१ जुलै २०१७ पासून शासनाने स्थानिक संस्था कर रद्द करुन वस्तू व सेवा कर (GST) लागू केल्याने महानगरपालिकेस होणा-या नुकसान भरपाई पोटी शासनाकडून अनुदान प्राप्त होत आहे. तसेच १% मुद्रांक

शुल्क अनुदानासह थकीत स्थानिक संस्था करापासून मिळणारे उत्पन्न गृहीत धरुन वस्तू व सेवा करापासून **रु. ९२१ कोटी** उत्पन्न सुधारित करुन **रु.९१७.८६ कोटी** प्रस्तावित आहे. सन २०१९-२० मध्ये वस्तू व सेवा कर अनुदान, १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान व थकीत स्थानिक संस्था करापासून **रु.९८७.७० कोटी** जमा अपेक्षित आहे.

**पाणी पुरवठा आकार**

सन २०१८-१९ करिता पाणी पुरवठा आकारापासून मिळणारे उत्पन्न **रु.१५५ कोटी**वरुन **रु.१३५ कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये स्मार्ट मिटरींग पध्दतीने पाणी पुरवठा करण्यास मान्यता मिळाली असल्याने यापासून **रु.१७५ कोटी** जमा अपेक्षित आहे.

**रस्ते खोदाई फी**

सन २०१८-१९ करिता रस्ते खोदाई फी **रु.१२५कोटी**वरुन **रु.७५ कोटी** सुधारित केलेली असून सन २०१९-२० मध्ये यापासून **रु.७५ कोटी** जमा अपेक्षित आहे.महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीच्या आयपीडीएक्स स्कीमसाठी रस्ता फोड फी दरामध्ये सवलत देण्यात आल्याने रस्ता फोड फी चे उत्पन्न कमी प्राप्त होणार आहे.

**अग्निशमन फी**

सन २०१८-१९ करिता अग्निशमन विभागाकडून फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस व फायर प्रिमियम चार्जेस पासून मिळणारे उत्पन्न **रु.११० कोटी**वरुन **रु.८९.१० कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये यापासून **रु.१५०.०८ कोटी** जमा अपेक्षित आहे.

**जाहिरात फी**

शहरामध्ये विविध ठिकाणी लावण्यात येणा-या होर्डींग, ॲडपोल, युनीपोल इत्यादीद्वारे प्राप्त होणा-या जाहिरात प्रसिध्दीवरील शुल्कापोटी मिळणारे उत्पन्न सन २०१८-१९ मध्ये **रु.२०.७५ कोटी**वरुन **रु.१८.४० कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये जाहिरात फीपासून **रु.२०.३७ कोटी** जमा अपेक्षित आहे.

**स्थावर मालमत्ता विभाग**

महापालिकेच्या स्थावर मालमत्तांच्या भाडयापासून मिळणारे उत्पन्न सन २०१८-१९ मध्ये **रु.१९.४० कोटी**वरुन **रु.१८.०५ कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये यापासून **रु.२०.४१ कोटी** जमा अपेक्षित आहे. स्थावर मालमत्ता विभागाने या आर्थिक वर्षात पुढीलप्रमाणे कामगिरी केली आहे.

- दिव्यांग व गटई स्टॉलधारकांना वारसाहक्काने स्टॉल हस्तांतरीत करण्यासाठी नियमावली व विहीत कार्यपध्दती पूर्ण केली, त्यामुळे मयत दिव्यांग व गटई स्टॉलधारकांच्या वारसाला न्याय मिळाला व

उपजिविकेचे साधन मिळाले.

- प्रथमच ३१६ इतक्या मोठया प्रमाणात दिव्यांगांना स्टॉलसाठी जागा उपलब्ध करुन दिल्यामुळे दिव्यांगाना स्वयंरोजगार उपलब्ध झाला.
- एकूण १६८ प्रकल्प बाधितांचे कायमस्वरुपी बी.एस.यु.पी. धर्मवीर नगर येथे पुनर्वसन करण्याची कार्यवाही करण्यात आली.
- एकूण ७० वाणिज्य प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही करण्यात आली.

**घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सेवांच्या दरवाढीचा प्रस्ताव सोबत सादर करण्यात येत आहे.**

अशा प्रकारे महापालिकेच्या सर्व विभागाकडून एकूण २०१८-१९ मध्ये अंदाजित केलेले महसुली उत्पन्न **रु.२९५० कोटी** वरुन **रु.२५८८.२८ कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये **रु.३१०५.४७ कोटी** महसुली उत्पन्न अपेक्षित केले आहे.

अनुदाने

ठाणे महानगरपालिकेला केंद्र शासन, राज्य शासन व इतर शासकीय विभागाकडून प्राप्त होणारे अनुदान सन २०१८-१९ मध्ये **रु.३२४.११ कोटी** वरुन **रु.२३४.४० कोटी** सुधारित केले असून सन २०१९-२० मध्ये **रु.१४४.६२ कोटी** अनुदान अपेक्षित आहे.

कर्ज व कर्जरोखे

सन २०१८-१९ मध्ये कर्ज व कर्जरोख्याद्वारे **रु.४४० कोटी** अपेक्षित केले होते. परंतु या आर्थिक वर्षात कर्ज उभारण्याची गरज भासली नसल्याने सुधारित अंदाजपत्रकात कर्जापोटी तरतूद कमी करण्यात आलेली असून सन २०१९-२० मध्ये **रु.५०० कोटी** कर्ज किंवा कर्ज रोखे प्रस्तावित आहे. सदरचे कर्ज हे महापालिका अंतर्गत मेट्रो, पीआरटीएस, कोस्टल रोड या प्रकल्पांसाठी घेण्यात येणार आहे.

वरील प्रमाणे आरंभिच्या शिल्लकेसह सन २०१८-१९ चे एकूण **रु.३२६५.६८ कोटी** सुधारित जमा अंदाज व सन २०१९-२० चे **रु.३८६१.८८ कोटी** मूळ जमा अंदाज मा.स्थायी समितीस सादर करीत आहे.

- **यापुढे मी खर्चाच्या महत्वाच्या बाबींवर भाष्य करु इच्छितो.**

महसूली खर्च

सन २०१८-१९ मध्ये महसुली खर्च रु.१८९८.३२ कोटी अपेक्षित केले होते. ते सुधारीत अंदाजपत्रकात रु.१६३१.७५ कोटी करुन सन २०१९-२० मध्ये रु.२०४०.९६ कोटी प्रस्तावित आहे.

**भांडवली खर्च**

कोणत्याही महानगरपालिकेची भांडवली खर्चात होणारी वाढ हे विकासाचे द्योतक आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये सन २०१४-१५ मध्ये भांडवली खर्च **रु.६४१.२७ कोटी** होता. सन २०१८-१९ च्या सुधारित अंदाजानुसार तो **रु.१५२२.१४ कोटी** करण्यात आला. सन २०१८-१९ च्या खर्चाशी याची तुलना केल्यास खर्चात १३७.३६% वाढ झालेली आहे.

**शहर विकास विभाग**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामधील विकास कामे करताना भांडवली खर्चात बचत करण्याच्या उद्देशाने मागील ४ वर्षापासून अशा सुविधांचा विकास समावेशक आरक्षण वा बांधीव सुविधेअंतर्गत करण्यावर भर देण्यात आला आहे.

महापालिका क्षेत्रात सुरु असलेल्या विविध विकास कामांतर्गत कन्स्ट्रक्शन टिडीआर / ए.आर. / सी.एस.आर. अंतर्गत रु. ५८७.५१ कोटी अंदाजखर्चाची कामे करण्यात येत आहेत. त्यापैकी अंदाजे खर्च रु. ३८.९१ कोटीची ८ कामे पूर्ण झाली असून, उर्वरित अंदाजे रु.५४८.६० कोटीची २५ कामे सुरु आहेत. याच मार्गाने पुढील ५ वर्षात महापालिकेकडे असलेल्या सदर बांधकाम योग्य सुविधा भूखंड व आरक्षित भूखंडाचा खाजगी सहभागाद्वारे विकसनाचे ध्येय ठेवणेत आले आहे.

**१. रस्ते**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विकास आराखड्यानुसार ७४२.९७ हेक्टर क्षेत्राचे रस्ते असून त्यापैकी CRZ व वन विभागांतर्गत बाधित होणारे अविकसनशील रस्त्याचे क्षेत्र २४९.८९ हेक्टर इतके आहे. त्यानुसार विकसनयोग्य रस्त्याखालील क्षेत्र ४९३.०८ हेक्टर इतके येत असून, विकास योजना मंजुरीपुर्वी म्हणजेच सन १९९९ पुर्वी ७२.७४ हेक्टर म्हणजेच १४.७५% इतके विकसन झालेले होते. सन १९९९ ते २०१४ पर्यंत १३१.५८ हेक्टर म्हणजेच २६.६८% इतके विकसन झालेले होते. त्यानुसार सदर कालावधीत विकास योजना अंमलबजावणी दर प्रती वर्ष १.६६% इतका होता.

ठाणे महापालिकेने सन २०१५ सालापासून सुमारे १०० हेक्टर रस्त्याखालील जागा संपादित करुन विकसित केलेली आहे. त्यामुळे सन २०१५ ते २०१९ या ४ वर्षाचे कालावधीत विकास

योजना अंमलबजावणीचा दर हा २०.२८% इतका असून, प्रतीवर्ष तो ५.०७% इतका आहे. अद्यापपर्यंत विकास योजना अंमलबजावणी दर ६१.७१% इतका राखणेस महापालिका यशस्वी ठरली आहे

तसेच पुढील पाच वर्षात सुमारे १४५ हेक्टर जमिन संपादित करण्याचे नियोजीत केले असून, एकूण रस्त्यांपैकी ९१.१% रस्ते संपादित करुन विकसित करणे प्रस्तावित आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण व मिसिंग लिंक द्वारे रस्त्यांची जोडणी करण्यासाठी गेल्या ४ वर्षात सुमारे १०० हेक्टर बांधकामाने बाधित क्षेत्र भूसंपादनाची अंदाजे किंमत रु. ३२३२.६२ कोटी इतकी आहे. रुंदीकरणांतर्गत बाधीत झालेल्या रहिवास २६३३ व वाणिज्य २४३ बांधकामांचे सुमारे १३५ कोटी रकमेचे पुनर्वसन आजमितीस बी.एस.यु.पी व रेंटल योजने अंतर्गत करण्यात आले आहे.

**२.समूह विकास योजना (Cluster Development) :-**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी शासनाने समूह विकास योजनेस दिलेल्या मान्यतेनुसार एकूण ४४ परिसराचे नागरी पुनःरुथ्थान आराखडयाचे नियोजन १५०८.९३ हेक्टर इतक्या क्षेत्रावर अंतिम करणेत आले आहे. त्यापैकी क्लस्टर योजना राबविणे कामी महानगरपालिकेने ६ परिसरांची प्राधान्याने निवड केलेली असून, त्यामध्ये कोपरी, हजुरी, टेकडी बंगला, लोकमान्यनगर, किसननगर आणि राबोडी परिसराचा समावेश आहे. या ६ आराखडयांना उच्चाधिकार समितीने मंजुरी दिली असून, सद्यस्थितीत या ठिकाणच्या क्लस्टर योजना अंमलबजावणीचे काम प्रगतीपथावर आहे.

**३. नव्याने निर्माण होणा-या रोजगाराच्या संधी**

- **टाऊन सेंटर (ठाणे ग्लोबल इम्पॅक्ट हब ) :-**

ठाणे शहरामध्ये नव्याने चालू होणा-या उद्योग व्यवसायाना प्रोत्साहन देणे व त्याद्वारे ठाणे शहराच्या आर्थिक विकासास चालना देण्याकरिता ठाणे महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये ग्लोबल इम्पॅक्ट हब हा उपक्रम सुरु करणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पासाठी तळ + १० मजल्याची इमारत विकासकाकडून बांधण्यात येत असून एकूण रु.७० कोटी इतक्या रकमेची बचत झाली आहे. त्यापैकी तळ + १

मजल्याचे काम पूर्णत्वास आले आहे. सदर उपक्रम येत्या ३ महिन्यात कार्यन्वित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात येत आहे. यासाठी अंदाजपत्रकात रु.५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

- नजिकच्या काळात शहरामध्ये विविध बहुराष्ट्रीय व देशांतर्गत नामांकीत उद्योग समुहांनी ठाणे शहराची निवड त्यांचे व्यवसाय स्थलांतरीत करण्याकरीता केलेली आहे. यामध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हीसेस यांचा २५ लक्ष चौ.फुटाचा प्रकल्प ज्यामध्ये अंदाजे २५,००० रोजगार उपलब्ध होणार आहेत, बायर क्रॉप सायन्स यांचा १० लक्ष चौ.फुटाचा प्रकल्प असे प्रकल्प भारतातील अन्य शहरामधून (उदा. मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद इत्यादी) ठाणे शहरात स्थलांतरीत झालेले आहेत. या शिवाय विविध आंतरराष्ट्रीय अग्रगण्य समूहदेखील ठाणे शहराची निवड त्यांचे प्रकल्पाकरिता करीत आहेत.

रोजगार निर्मिती व सेवा उद्योग शहरात कार्यान्वित होण्याकरीता शहरात दाखल होणा-या उद्योग समूहांना महापालिकेमार्फत आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत आश्वासीत केल्याने व त्यानुसार पायाभूत सुविधा निर्माणाची अंमलबजावणी होत असल्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ठाणे शहराची नोंद प्रगतीशील व पायाभूत सुविधांनी समृध्द शहर अशी होत आहे.

**४.पार्किंग सुविधा विकसन**

ज्युपिटर हॉस्पिटल शेजारी महानगरपालिकेच्या ताब्यातील ११३५७.२३ चौ.मी. सुविधा भूखंडावर १६०० चार चाकी वाहनांसाठी तळ + १० मजल्याचे सुसज्ज वाहनतळ, पार्किंग प्लाझा विकसित करण्याचे काम कन्स्ट्रक्शन टि.डी.आर. च्या माध्यमातून सुरु करण्यात आले असुन ८ व्या मजल्यापर्यंत पूर्ण असून, सदर पोटी येणारा खर्च रु.११९ कोटी बचत होणार आहे.

कशिश पार्क येथील सुविधा भूखंडावर सुसज्ज वाहनतळासहीत प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून, सदर पोटी येणा-या खर्चात रु.३२ कोटीची बचत होणार आहे.

वरील पायाभूत सुविधांचे विकसनामुळे एकूण अंदाजे रु. १५१ कोटी खर्चाच्या पार्किंग सुविधांची कामे विनामुल्य होणार आहेत.

**५.आरोग्य विषयक सुविधांचे खाजगी सहभागातून विकसन :-**

- **मेडीटेशन व होलीस्टीक सेंटर :-**

घोडबंदर रोड येथील विजय विलास गृहनिर्माण संकुलातील सुविधा भूखंडावर होलिस्टीक, मेडीटेशन, स्पिरिच्युअल सेंटरचे बांधकाम पूर्ण होऊन प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरी विश्वविद्यालय या संस्थेसमवेत संयुक्त भागीदारी तत्वावर परिसरातील नागरिकांना आत्मिक उन्नतीच्या दृष्टीकोनातून सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

- **श्रीनगर येथील मॅटर्निटी होम आरक्षणातून समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसन :-**

श्रीनगर येथे समावेशक आरक्षणामधून रु. ३.५ कोटी किमंतीचे तळ अधिक ६ मजल्याचे मॅटर्निटी होम पूर्ण होऊन इमारत आरोग्य विभागास हस्तांतरीत करण्यात आली असून, सदर मॅटर्निटी होम नजीकच्या काळात लोकार्पण करण्यात येत आहे.

- **मॉर्डन स्किल्ड डेव्हलपमेंट सेंटर ऑफ हयुमन एक्सलेन्स इन हेल्थ केअर :-**

लोढा लक्झरीया या संकुलातील समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसित केलेल्या स्टिल्ट + ५ या ७३३४ चौ.मी. क्षेत्रफळाच्या इमारतीमध्ये विविध पॅरामेडिकल कोर्सेस, स्किल्ड डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, ऑडिओ व व्हिडिओ मल्टीमिडिया सेंटर,मेडिटेशन हॉल व योगा झोन पुरविणा-या अत्याधुनिक व स्वतंत्र अशा विशिष्ट प्रकारच्या आरोग्य विषयक सेवा शिक्षण पुरविणारे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी पीपीपी तत्वावर संबंधित संस्थेशी सामंजस्य करार केला असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

**६. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मनोरंजना करीता सार्वजनिक उद्याने विकसीत करणे**

- **बाळकूम-कोलशेत रोड येथे सेंट्रल पार्क विकसित करणे :-**

बायर इंडिया कंपनीमधील प्राप्त सुविधा भूखंडापैकी ७६००० चौ. मी. क्षेत्रफळावर एकूण रु.८३.५० कोटी किमतीचे "सेंट्रलपार्क" विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर असून आजमितीपर्यंत रु.३० कोटी रकमेचे विकसन पूर्ण होवून प्रथम टप्प्यात पूर्ण झालेले पार्क सामान्य नागरिकांसाठी खुले करण्यात येत आहे.

- **पोखरण रोड नं.२ येथे कम्युनिटी पार्कचा विकास :-**

पोखरण रोड नं. २ येथील ८२८७ चौ.मी. क्षेत्रामध्ये कम्युनिटी पार्क कंस्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून विकसित करण्यात आले आहे. सदर पार्क नागरिकांना खुले करण्यात आले असून दररोज सर्वसाधारणपणे ५०० नागरिक या कम्युनिटी पार्कचा लाभ घेत आहेत.

- **हिरानंदानी इस्टेट लगत बगीचाचे तलावासहीत विकसन (Southern Park) :-**

कावेसर येथील तलावालगत बगीचा आरक्षण क्रमांक ९ चे क्षेत्र ३५९०० चौ. मी. क्षेत्रफळ असून, सदरचे आरक्षण विकासकाकडून विकसित करुन आरक्षणालगतचा तलाव ठाणे महानगरपालिका विकसित करत आहे. सदर कामांतर्गत रु.१५.५० कोटी खर्चाची कामे विनामुल्य प्राप्त होणार आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना मनोरंजनाची मोठी जागा उपलब्ध होणार आहे.

- **ब्रम्हांड परिसरालगत पार्कचे विकसन (Northern Park) :-**

ब्रम्हांड परिसरालगत पार्क आरक्षण क्र. ५ मध्ये पार्क विकसन टप्प्याटप्याने करण्यात येणार असून, सदर कामांतर्गत रु.३१.७५ कोटी खर्चाची कामे विनामूल्य प्राप्त होणार आहेत.

- **अर्बन फॉरेस्ट्री :-**

जैव विविधता जोपासण्यासाठी कलरकेम कंपनीमधील सुविधा भुखंडावर रु. २५ कोटी किमतीचे ८ एकर क्षेत्रावर अर्बन फॉरेस्ट्रीचे विकसन कन्स्ट्रक्शन टि.डी.आर. च्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

- **चिल्ड्रन ॲण्ड ट्रॅफिक पार्क :-**

कावेसर येथील १०,३८८.० चौ.मी. क्षेत्रावर अंदाजे रु.१० कोटी किमतीचे कंस्ट्रक्शन पार्क टिडीआरच्या माध्यमातून विकसन करण्यात आले असून सदरचे पार्क नागरिकांना खुले करुन देण्यात आले आहे. यामध्ये वाहतुकीचे नियम दृश्य स्वरुपात व मॉडेलच्या स्वरुपात दर्शविण्यात आलेले असल्यामुळे विद्यार्थी / नागरीकांना वाहतुकीच्या नियमांची माहिती होवून व त्यांचे पालन होवून रस्त्यावरील अपघाताचे

प्रमाण लक्षणीयरित्या कमी होण्यास मदत होणार आहे.

**७.सामाजिक सुविधांचे विकसन**

- **जिम्नॅस्ट सेंटर आणि स्पोर्टस कॉम्पलेक्स :-**

ठाणे महानगरपालिकेमार्फत पोखरण क्र. २ येथील टाटा गृहनिर्माण प्रकल्पातील सुविधा भुखंडावर सुमारे रु.२५ कोटी किमतीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे जिम्नॅस्ट सेंटर आणि स्पोर्टस कॉम्पलेक्स बांधीव सुविधेंतर्गत सुरु आहे. संपूर्ण आर.सी.सी. बांधकाम पूर्ण झालेले असून, येत्या आर्थिक वर्षात सदर सुविधा लोकार्पण करण्याचा मानस आहे.

- **जवाहरबाग स्मशानभूमी विस्तारीकरण व आधुनिकीकरण**

जवाहरबाग स्मशानभूमी विस्तारीकरण व आधुनिकीकरणाचे काम सी. एस. आर. च्या माध्यमातून विकसित करण्यास सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने सामाजिक संस्थेमार्फत २८४० चौ.मी. क्षेत्रावर सुरु असून सदर धूर विरहीत स्मशानभुमीचा प्रथम टप्पा नागरिकांसाठी लवकरच लोकार्पण करण्यात येत आहे.

- **मार्केट व लायब्ररी आरक्षण विकसनाबाबत :-**

मौजे बोरीवडे येथील मार्केट व लायब्ररी समावेशक आरक्षणाअंतर्गत विकसन करून तळ + ३ मजल्याची इमारत बांधून तयार असून, अंतर्गत कामे सुरु आहेत. येत्या आर्थिक वर्षात मार्केट, हॉल व लायब्ररीची सुविधा नागरिकांस खुली करण्यात येईल.

- **भाईंदरपाडा येथील संयुक्त स्मशानभूमी व स्मृती उद्यान :-**

भाईंदरपाडा येथे सुमारे ३७००० चौ.मी. संयुक्त स्मशानभूमी व स्मृती उद्यान आरक्षणाखालील जमिनीपैकी २३२१० चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले असून, संयुक्त स्मशानभूमीकरीता कन्स्ट्रक्शन टि.डी.आर.च्या माध्यमातून टप्याटप्याने पुढील तीन वर्षात विकसन करणे प्रस्तावित आहे.

- **कौसा येथील मित्तल ग्राऊंड परिसरातील स्मशानभूमी, ख्रिश्चन व मुस्लिम समाजासाठी दफनभूमी :-**

सेक्टर क्र. ९ मधील कौसा येथील मित्तल ग्राऊंड स्टेडियम जवळील भागातील संयुक्त स्मशानभूमी, आरक्षण क्षेत्र २०,००० चौ. मी. महानगरपालिकेच्या ताब्यात आले असून त्याचे विकसन पूर्ण

करुन नागरिकांसाठी सदरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**८. शैक्षणिक सुविधा**

खारेगांव येथील कावेरी हाईटस येथील प्राथमिक व माध्यमिक शाळा आरक्षणाचे जागेवर समावेशक आरक्षणामधून ३०५० चौ.मी. क्षेत्राचे शाळा इमारतीचे रु. ३ कोटी खर्चाचे विनामूल्य प्राप्त होणार असून, सदर भागात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देता येणार आहे.

**९. सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस स्थानकांचा विकास करणे**

- **कासारवडवली व कळवा पोलिस स्टेशनचे विकसन :-**

कासारवडवली पोलिस स्टेशन व कळवा पोलिस स्टेशन या इमारतींचे बांधकाम कन्स्ट्रक्शन टि.डी.आरचे माध्यमातून करण्यात आलेले असून, सदर बांधकामाचा खर्च अनुक्रमे रु. ६.७९ कोटी व रु.२.९७ कोटी असून, सदर इमारती पोलिस विभागास हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

- **चितळसर मानपाडा व डायघर पोलिस स्टेशन**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) रेंटल योजनेअंतर्गत चितळसर मानपाडा येथे रेंटल इमारतींमध्ये पोलिस स्टेशन तसेच डायघर येथील जकात नाक्याची जागा वापर पोलिस स्टेशनकरीता वापरासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

- **शीळ-कल्याण रस्त्यालगत खिडकाळी पोलीस स्टेशनचे विकसन**

शिळ - कल्याण रस्त्यालगत असलेल्या पोलीस स्टेशन आरक्षणाचे जागेवर समावेशक आरक्षणामधून विनामूल्य पोलीस स्टेशन व त्यावर पोलिस निवास व्यवस्था असे तळ अधिक सहा मजले बांधकाम सुरु असून, खिडकाळी, डायघर, शिळ, देसाई, डावले, पडले हया भागामधील कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता सदर पोलीस स्टेशन उपयुक्त ठरेल.

- **दिवा पोलिस स्टेशन**

दिवा विभागाकरिता डोमखार येथील पोलिस स्टेशन आरक्षणाचे विकसन समावेशक आरक्षणामधून करण्याकरीता विकसन प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून येत्या आर्थिक वर्षात सदर पोलिस स्टेशन सुरु होइल.

शिळ ते दिवा या परिसरातील वाढत्या नागरीकरण याकरिता सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीन खिडकाळी व डोमखार येथे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून पोलिस स्टेशन व कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम सुरु आहे.

त्यामुळे ठाणे महानगरपालिकेने उपरोक्त पोलिस स्टेशनची निर्मिती करुन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा हातभार लावला आहे.

**१०. मत्सालय**

गोल्डन डाईज नाका येथील अग्निशमन केंद्रालगत रु. २ कोटी किमतीचे ७९० चौ.मी. क्षेत्राचे मत्स्यालय बांधण्याचे काम समावेशक आरक्षणांतर्गत करण्यात येणार आहे.

**११. प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाकरीता योजना**

महापालिकेने हाती घेतलेल्या महत्वांकाक्षी रस्ता रुंदीकरण व मिसिंग लिंकचा विकास तसेच महत्वाच्या आरक्षित भूखंडावरील मोठया प्रमाणावर बाधीत बांधकामधारकांचे पुनर्वसन करण्याकरीता रेंटल हौसिंग योजनेमधून ठाणे महानगरपालिकेस येत्या वर्षभरात सुमारे २५०० घरे व वाणिज्य गाळे उपलब्ध होणार असून, त्याचा वापर पुनर्वसनाकरिता करण्याचे प्रस्तावित आहे.

हौसिंग फॉर डिसहाऊस आरक्षणाचे विकसनामध्ये ठाणे महानगरपालिकेस ४९७ घरे प्राप्त होणार असून, बी.एस.यु.पी. प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणा-या एकूण सदनिकांपैकी येत्या अर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिकेस पुनर्वसनाकरिता १८४७ घरे प्राप्त होणार आहेत.

**१२. म्युनिसिपल हौसिंग आरक्षणाचे विकसन**

पूर्व द्रुतगती महामार्गालगत असलेल्या चिरागनगर परिसरातून म्युनिसिपल हौसिंगच्या अंदाजे रु. १९ कोटी किमतीच्या एकूण २०० सदनिका पार्किंग व्यवस्थेसह समावेशक आरक्षणाच्या विकसनामधून ठाणे महानगरपालिकेस प्राप्त होणार आहेत.

**१३. खिडकाळी येथील एज्युकेशन हब**

मौजे खिडकाळी येथील ११३.१२ हेक्टर या जागेवरील हरित विभाग तसेच लो कॉस्ट म्युनिसिपल स्पोटर्स कॉम्प्लेक्स हे आरक्षण बदलून त्याऐवजी शैक्षणिक प्रयोजनार्थ असे आरक्षणास शासनाची

मंजुरी प्राप्त झाली असून, संपादनाची कार्यवाही प्रस्तावित आहे. सदर ठिकाणी रसायन तंत्रज्ञान संस्था इच्छूक असून, इंडियन इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी आदी संस्था तसेच नामांकित आंतरराष्ट्रीय उच्च शिक्षण संस्था या क्षेत्रात पाचारण करुन ठाणे महानगरपालिका तसेच जिल्हयातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होऊ शकेल.

**१४. ऑटो डिसीआर छाननी कक्षाबाबत**

विकास प्रस्तावाशी संबंधित अर्जावरील सर्व कार्यवाही करीता एक खिडकी संगणक प्रणाली आणि विकास परवानगीची संपूर्ण कार्यपद्धती पेपरलेस करण्याकरिता संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. Ease of doing business सह सर्व वसुली संगणक प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने करण्याचा पहिला टप्पा कार्यान्वित करण्यात आला आहे.

**१५. पेपरलेस टिडीआर**

ठाणे महापालिकेमार्फत सद्यस्थितीला टिडीआरचे हस्तांतरण व वापर हा कागदपत्राद्वारे पारंपारीक पध्दतीने करण्यात येत आहे. सदर पध्दती पेपरलेस टिडीआर करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणालीव्दारे टिडीआरचे हस्तांतरण व वापर याबाबतची कार्यवाही डिजीटाईझ होणार आहे. सदर पेपरलेस टिडीआर पध्दती अवलंबण्याकरीताचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

**१६. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत प्रस्तावित व मंजूर झालेल्या फेरबदलाबाबत.**

ठाणे शहराच्या मंजूर विकास आराखडयात मागील चार वर्षात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये २९ फेरबदल प्रस्तावित करण्यात आले होते. सदर फेरबदलांपैकी १२ फेरबदल शासनाने अंतिम केलेले असून, १७ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे मंजुरीच्या कार्यवाहीत आहे. तसेच प्रशासनामार्फत नव्याने १२ फेरबदल प्रस्तावित केलेले असून, त्याबाबतचे प्रस्तावावर कार्यवाही सुरु ओह.

**प्रमुख मंजूर फेरबदलांची यादी पुढीलप्रमाणे**

१. मौजे आगासन येथील IROW आ.क्र. १ क्षेत्र १३.८७ हेक्टर अंतर्गत प्रभाग कार्यालय, हॉस्पिटल, मार्केट, पोलीस स्टेशन, अग्निशमन केंद्र, पार्किंग, पाणी पुरवठा करीता पाण्याची टाकी, १५ मी. रुंद रस्ता, बस स्टँड आरक्षणे

२. सेक्टर क्र. ११, मौजे खिडकाळी येथील शैक्षणिक प्रयोजनार्थ ११३.१२ हेक्टर क्षेत्राची आरक्षणे.

३. नागरी पुनर्निर्माण समूह विकास योजना (अर्बन रिन्युअल स्किम) नियमावली फेरबदल

४. अग्निशमन व हायराईज कमिटीकरिता परिशिष्ट "ओ" मध्ये नियमावलीत फेरबदलानुसार हायराईज कमिटीची स्थापना करण्यात आली.

५. सदनिकेअंतर्गत फेरबदल करण्याकरिता सुलभ नियमावली मंजूर.

६. सेक्टर क्र. २, मौजे माजिवडे येथील पोलिस हाऊसींग आरक्षण आणि त्याजागेतून जाणारे HCMTR व MRTS चे रेषेत बदल करुन नव्याने पार्किंग आरक्षण.

७. मौजे बाळकूम येथील एस. टी. वर्कशॉप २.२५ हेक्टर आरक्षणाचे नामाधिमानात फेरबदल करुन अवजड वाहनांचे पार्किंग आरक्षण.

८. मौजे मुंब्रा येथील स. नं. १०२/१/अ क्षेत्र १७.५५ हेक्टर या जमिनीवर मुंब्रा प्रभाग समिती कार्यालयासाठी व कल्चरल सेंटर फेरबदल

**१७. पेन्ट द वॉल**

ठाणे शहराच्या सुशोभिकरणाच्या दृष्टीकोनातून प्रथमच ठाणे महानगरपालिका व स्थानिक चित्रकार यांच्या संयुक्त सहभागातून शहरात "पेन्ट द वॉल" ही संकल्पना राबविण्यात आली आहे. सदर संकल्पनेमुळे स्थानिक चित्रकारांना कला सादर करण्याकरीता व्यासपिठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रथम टप्प्यात रस्त्यालगत, दर्शन िभागात उपलब्ध असलेल्या

मिळकतींच्या ४३७५ मी. लांबीमध्ये (७९४१.१८ चौ.मी. क्षेत्रात) संरक्षक भिंती रंगविण्यात आल्या आहेत. सदर कामात प्रमुख्याने पोखरण रोड नं. १, वसंत विहार हायस्कूल परिसर, तत्वज्ञान विद्यापीठ - तुळशीधाम, राबोडी, कळवा हॉस्पिटल, नौपाडा इ. परिसरांचा समावेश आहे. सदर कामी खाजगी कंपन्यांनी सहभाग घेऊन उपक्रम राबविण्यास सहकार्य केले आहे. यामुळे शहराच्या सौदर्यीकरणात भर पडली आहे.

स्थानिक चित्रकारांना तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी तसेच शहर स्वच्छतेकरीता राबविण्यात आलेला हा विशिष्ट उपक्रम आहे.

**१८. पेन्ट द स्लम**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील स्लम सुशोभिकरण दृष्टीने पेन्ट द स्लम हा उपक्रम प्रथमच ठाणे महानगरपालिका व मिसाल मुंबई या खाजगी संस्थेच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात आला आहे. सदर उपक्रमांतर्गत डोंगरीपाडा, इंदिरानगर व पारसिक रेतीबंदर येथील स्लम विविध आकर्षक रंगांनी रंगवून सदर संपूर्ण परिसर सुशोभित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत या परिसरातील मुलभूत सुविधांचे जसे घनकचरा व्यवस्थापन, परिसर स्वच्छता , विद्युत दिवे इत्यादी विकसन करण्यात आले आहे.

यामुळे झोपडपट्टी परिसरात स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, व रोजगार निर्मितीबाबत जागृती निर्माण करण्यात आली.

**सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु असलेल्या प्रकल्पांची माहिती पुढीलप्रमाणे.**

**रस्ते विकसन**

शहराच्या विकासात रस्त्यांना अनन्य साधारण महत्व आहे. ठाणे शहरामध्ये दळणवळण सुखकर व गतीमान होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणात रस्ता रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. यावेळी मोठया प्रमाणात इमारती, घरे, दुकाने, इत्यादी तोडण्यात आली. परंतु बाधितांचे पुनर्वसन करण्याचे नियोजन सुध्दा महापालिकेकडून करण्यात आले. अशी कार्यवाही करतांना काही ठिकाणी तात्कालिक विरोधाचा सामना सुध्दा करावा लागला. तरी ही तो झुगारुन रस्ता रुंदीकरणाची कामे जिद्दीने पूर्ण करण्यात आली.

" यूं तो उत्फत के तकाजे बहुत है ।.
इक वों जालिम बहुत है,
इक हम जिद्दी बहुत है ।। "

सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापर्यंत मागील ४ वर्षात मंजूर विकास योजनेनुसार नव्याने रस्ते विकसित करणे, अस्तित्वातील रस्त्यांचे विकास आराखडयानुसार रुंदीकरण व अस्तित्वातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण तसेच अस्तित्वातील रस्त्यांचे डांबरीकरण पध्दतीने पुनर्पुष्ठीकरण करणे याप्रमाणे **एकूण ३०२.२३ कि.मी. लांबीच्या एकूण ७४३ रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली** असून कन्स्ट्रक्शन टिडीआर च्या माध्यमातून ४.१९ कि.मी. ( ७ रस्ते) याप्रमाणे एकूण ३०६.४२ कि.मी. (७५०) रस्ते हाती घेण्यात आले आहेत.

- अस्तित्वातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण (सीसी/युटीडब्ल्यूटी) - १७८.१० कि.मी. (६०० रस्ते)
- अस्तित्वातील रस्त्यांचे रुंदीकरण (विकास आराखडयानुसार) ४९.२४ कि.मी. (४६ रस्ते)
- विकास आराखडयातील रस्ते (नव्याने विकसन)- ५४.६२ कि.मी. (७२ रस्ते)
- कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून - ४.१९ कि.मी. (७ रस्ते )
- अस्तित्वातील रस्त्यांचे पुर्नपृष्ठीकरण (डांबरीकरण पध्दतीने)- २०.२६ कि.मी. (२५ रस्ते)

**वरील नियोजनाप्रमाणे सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्यात आलेले व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पूर्ण होणारे रस्ते खालील प्रमाणे आहेत.**

- डांबरी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण (सी.सी. / यु.टी.ड.ब्ल्यु.टी)- ९३.७९ कि.मी. (३३० रस्ते)
- अस्तित्वातील रस्त्यांचे रुंदीकरण (विकास आराखडयानुसार) - २३.०५ कि.मी. (२० रस्ते)
- विकास आराखडयातील रस्ते (नव्याने विकसीत) - ११ कि.मी. (२१ रस्ते)
- कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून - ०.५० कि.मी. (२ रस्ते )

- अस्तित्वातील रस्त्यांचे पुनर्पूष्ठीकरण (डांबरीकरण पध्दतीने) - ११.१९ कि.मी. (१९ रस्ते)

सन २०१५-१६ पर्यंत ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये रस्त्यांचे जाळे अंतर्गत रस्त्यांची एकूण लांबी ३५६ कि.मी. होती. त्यापैकी सिमेंट कॉंक्रीट / यु.टी.डब्ल्यु.टी पध्दतीने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांची लांबी १०८.२५ कि.मी. असून उर्वरीत रस्ते डांबरीकरण पध्दतीने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांची लांबी २३१ कि.मी. आहे.

**३१ मार्च २०१९ पर्यंत ११.५० कि.मी. लांबीमध्ये नव्याने विकसित केलेल्या रस्त्यांचे बांधकाम पूर्ण होणार आहे. त्यामुळे अस्तित्वातील रोड नेटवर्कमध्ये वाढ होऊन रस्त्याची लांबी एकूण ३६७.५० कि.मी. होणार आहे. त्यापैकी डांबरी रस्त्यांचे कॉंक्रीट रस्त्यामध्ये रुपांतर झालेल्या रस्त्यांची लांबी २०२.०३ कि.मी. होणार आहे. त्यानुसार ठाणे शहरातील ५७ टक्के रस्ते खड्डे मुक्त असणार आहेत.**

उर्वरीत रस्त्यांचे बांधकाम सन २०१९-२० मध्ये ९०% व सन २०२०-२१ मध्ये १००% पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**मागील ४ वर्षात मंजूर विकास आराखडयातील रस्ते विकसीत करण्याचे काम हाती घेण्यात आले असून सन २०१८-१९ पर्यंत विकास आराखडयातील रस्त्यांचे संपादित केलेल्या क्षेत्रानुसार ६१.७१ % व रस्त्यांच्या लांबीनुसार एकूण ७२ टक्के डि.पी. रस्ते विकसीत करण्याची अंमलबजावणी झालेली आहे. तसेच २०२०-२१ पर्यंत ८४ टक्के रस्ते विकसनाबाबत अंमलबजावणी करण्याचे नियोजन आहे.डी.पी. रस्त्यांची अंमलबजावणी करण्याकरीता पंचवार्षिक योजना तयार करण्यात आली असून त्या अंतर्गत उर्वरित ३२ कि.मी. रस्ते भविष्यात विकसित करण्याचे प्रस्तावित असून सदरचे रस्ते विकसित केल्यानंतर ९१.१०% डी. पी. रस्त्यांची अंमलबजावणी होणार आहे. तसेच रस्ते प्रकल्पांतर्गत एकूण रु. १०९१.२५ कोटी एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली होती व त्या अनुषंगाने दोन ते तीन वर्षाच्या आर्थिक नियोजनासह रु.२१०९.५९ कोटी इतक्या रकमेच्या रस्ते बांधकामांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी या ४ वर्षात रु. ६६३.८७ कोटी खर्च करण्यात आला आहे.**

सन २०१८-१९ व यापुर्वी हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यासाठी सिमेंट काँक्रीट रस्ते या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.२३ कोटी,** रस्ता नुतनीकरण **रु.८० कोटी,** विकास आराखडयातील रस्ते **रु.१२५ कोटी**, यु.टी.डब्ल्यु.टी रस्ते **रु.१२५ कोटी** व मिसिंग लिंक **रु.५० कोटी** तरतूद प्रस्तावित असून या रस्ते प्रकल्पासाठी एकूण रु.४०३ कोटी इतकी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

**उड्डाणपूल**

ठाणे शहराच्या जलदगतीने होत असलेल्या सर्वांगीण विकासामुळे लोकसंख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली असून त्यामुळे शहरामध्ये सद्यस्थितीतील व भविष्यातील भेडसावणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन ठाणे महापालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मागील ४ वर्षात ठाणे शहरात विविध ठिकाणी उड्डाणपूल व  पादचारी पूल बांधण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत.

उड्डाणपुलातंर्गत लाल बहादूर शास्त्री मार्गावर ३ ठिकाणी उड्डाणपूल बांधण्यात येत असून, त्यापैकी अल्मेडा चौक येथील उड्डाणपूलाचे काम मे २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत दोन मीनाताई ठाकरे चौक व संत नामदेव चौक हे उड्डाणपूल फेब्रुवारी २०१९ अखेर पूर्ण करण्यात येतील.

कोपरी येथील पुलाचे प्रथम टप्प्यात रुंदीकरणाचे काम एमएमआरडीएमार्फत सुरु करण्यात आले असून सदरचे काम सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच द्वितीय टप्प्यात अस्तित्वातील पुलाचे नव्याने बांधकाम हाती घेण्यात येणार असून, सदर पुलाचे बांधकाम सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- **कळवा खाडीवर पूल:-**

कळवा खाडीवरील पुलाचे बांधकाम ६०% पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम हे डिसेंबर २०१९ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **देसाई खाडी वरील पूल :**

दिवा शिळ परिसरातील खिडकाळी, पडले, सागर्ली या अंतर्गत भागातील नागरिकांना वाहतुकीसाठी दिवा-शिळ मार्गाचा वापर करावा

लागतो. सदरचा मार्ग वळसा घेऊन जास्त लांबीचा असल्याने सदरील नागरिकांना वाहतुकीसाठी जवळचा मार्ग उपलब्ध होण्याच्या हेतूने देसाई खाडीवर पूल बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर पूलाची लांबी १८० मिटर व रुंदी ३० मिटर प्रस्तावित असून पुलाच्या दोन्ही बाजूस डि.पी रोडला जोडण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा खर्च रु.५६.०४ कोटी आहे. सदर पुलाचे बांधकाम सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्त्यावरील पुलाचे रुंदीकरण व विकास अंतर्गत **रु.१२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **पादचारी पूल:**

मागील ४ वर्षात एकूण १३ ठिकाणी पादचारी पूल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून त्यापैकी ६ पादचारी पुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत ७ पादचारी पूलांचे बांधकाम सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी **रु.१२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **आर.ओ. बी :-**

**खारेगाव :**

खारेगाव येथे रेल्वे मार्गावरील मुख्य पुलाचे बांधकाम मध्य रेल्वे मार्फत करण्यात आले असून सदर पुलाच्या पुर्व व पश्चिम भागास जोड रस्त्याचे बांधकाम ४५ टक्के पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत बांधकाम **ऑक्टोबर २०१९** मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. सदरच्या पुलामुळे वाहनांना पुर्व - पश्चिम दिशेकडे जाण्याचा सुरक्षित पर्याय उपलब्ध होणार असून रेल्वे फाटक सुरक्षिततरित्या ओलांडता येणार आहे. सदर प्रकल्पांचा खर्च **रु. २७.३५ कोटी** आहे. सन २०१९-२०मध्ये यासाठी रु.८ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

- **दिवा :**

दिवा स्थानकावरुन दररोज ४ ते ५ लक्ष प्रवाशांची वर्दळ असते. रेल्वे क्रॉसिंग करतांना ब-याच प्रमाणात अपघात होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने ठाणे महानगरपालिकेमार्फत सन २०१८-१९ या वर्षात आर.ओ.बी. चे बांधकाम हाती घेण्यात आले असून सदरचे बांधकाम २०२०-२१ या वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्पाचा खर्च रु.३८.५६ कोटी आहे.सन २०१९-२०मध्ये यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**महापालिकेमार्फत घेण्यात आलेल्या पूल प्रकल्पांतर्गत मागील ४ वर्षात एकूण २४३.२५ कोटी एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली होती व त्या अनुषंगाने रु.३५६.५८ कोटी इतक्या रकमेच्या पुलांचे बांधकामांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी या ४ वर्षात रु. १३९.३५ कोटी खर्च करण्यात आला आहे.**

**ग्रेड सेपरेटर**

तीन हात नाका येथील वाहतूक कोंडीवर कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून ग्रेड सेपरेटर - अंडरपास प्रस्तावित असून यासाठी सविस्तर प्रकल्प अभ्यास अहवाल करण्याचे काम प्रगती पथावर आहे. सदरचा डीपीआर तयार झाल्यानंतर केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाकडे सादर करण्यात येईल. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयातून अनुदान प्राप्त होणार आहे. यासाठी सन २०१९-२० मध्ये **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**ठाणे अंतर्गत मेट्रो प्रकल्प**

ठाणे महानगरपालिकेने जनसामान्यांसाठी मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ठोस निर्णय घेतलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ठाणे अंतर्गत मेट्रो, पीआरटीएस, अंतर्गत जलवाहतूक इत्यादीचा समावेश आहे. याबाबत एक शेर अर्ज आहे.

" आये हो निभाने को जब
किरदार जमीं पर,
कुछ ऐसा कर चलो कि,
जमाना मिसाल दे ।। "

ठाणे आंतरशहर मेट्रोला (मेट्रो लाईन-IV) पूरक सेवा करिता महापालिकेने शहरांतर्गत मेट्रोचा मार्ग मंजूर विकास आरखडयामध्ये दर्शविलेल्या एच.सी.एम.टी.आर तसेच रस्ते वर प्रस्तावित केला आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) यांनी सर्वकष वाहतुक आराखडा व प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यामध्ये प्रथम टप्प्यामध्ये २९.०० कि.मी मेट्रोचा मार्ग प्रस्तावित नवीन स्टेशन ते नवीन स्टेशन पर्यंत वतुर्ळाकार सुचविला आहे. यावतुर्ळाकार मार्गामध्ये २२ स्टेशन प्रस्तावित केले आहे. त्यापैकी २ स्टेशन्स भूमिगत स्टेशन राहणार आहेत.

प्रकल्प अंमलबजावणीबाबत मेट्रो प्रणाली उभारणी खर्च, भूसंपादन व पुनर्वसन खर्च याकरीता रु.९,६७४ कोटी अधिक लागू असणारे कर इतका भांडवली खर्च अपेक्षित आहे. शासन अनुदान, कमी दराचे कर्ज उभारणी त्याचप्रमाणे ठाणे महानगरपालिकेचे अर्थतरतुदीतून २० टक्के पर्यंत हिस्सा इत्यादी मार्फत सदरचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्प २०२३ अखेर पर्यंत कार्यान्वीत करणेचा मानस आहे. यासाठी सन २०१९-२० मध्ये **रु.४० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**अंतर्गत जलवाहतूक**

ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण पहाता, वेळ व इंधनाची बचत होऊन, वाहतूक कोंडीवर उपाय - वाहतूकीसाठी पर्याय म्हणून शहरास लाभलेल्या खाडी किना-यांचा अंतर्गत जलवाहतुकीसाठी वापर करता येईल हा उदात्त दृष्टीकोन ठेवून ठाणे महापालिकेमार्फत दोन टप्प्यात जलमार्गांच्या प्रकल्पांचे नियोजन आहे.

**टप्पा क्र.१:- वसई- ठाणे - कल्याण (जलमार्ग क्र.५३) :-**

प्रथम टप्प्यात वसई-ठाणे- कल्याण (जलमार्ग क्र.५३) या ५४ कि.मी. लांबीच्या जलमार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला. यामध्ये कोलशत येथे मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब व ९ ठिकाणी- वसई, मिराभाईंदर, घोडबंदर, नागला, काल्हेर (भिवंडी), अंजूर दिवे (भिवंडी), पारसिक, डोंबिवली (ठाकूर्ली), व कल्याण या ठिकाणी जेटी बांधणे, फेअरवे डेव्हलपमेंट, पर्यावरणीय बाबी १० व्हेसल्स विकत घेणे या सर्व अनुषंगिक सुविधा पुरविणेचा समावेश असून यासाठी रक्कम रु.६६१.१४ कोटी प्रकल्प खर्च अपेक्षित आहे. केंद्र शासनाच्या भारतीय अंन्तर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, दिल्ली (IWAI) यांजकडून सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता मिळाली आहे. याकामी संपूर्ण अनुदान देखील केंद्र शासनाकडून प्राप्त होणार आहे.

त्यानुसार प्रथम टप्प्यात Quick Start for the Project साठी मीरा भाईंदर, कोलशेत, काल्हेर (भिवंडी), डोंबीवली या चार ठिकाणी भूसंपादन, जेटी उभारणे व अनुषंगिक कामे- रोड कनेक्टीव्हीटी, फ्लोटींग पांटुन्स, बोलार्ड व फेन्डर्स, पार्किंग एरिया, टीकेटींग शॉप रिव्हर इन्फॉर्मेशन सिस्टिम व व्हेस्सल यासाठी रु.१२८.८९ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

**टप्पा क्र.२ :- ठाणे-मुंबई व ठाणे-नवी मुंबई (जलमार्ग)**

द्वितीय टप्प्यातील ठाणे-मुंबई व ठाणे- नवी मुंबई या दोन्ही जलवाहतूक मार्गांचे देखील नियोजन करण्यासाठी (Pre-Feasibility) व्यवहार्यता अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये ठाणे -मुंबई दरम्यान १० ठिकाणी (साकेत, कळवा, विटावा, मीठबंदर, ऐरोली, वाशी ट्रॉम्बे, एलिफंटा, फेरीव्हार्फ, गेट वे ऑफ इंडिया) व ठाणे-नवी मुंबई दरम्यान ८ ठिकाणी (वाशी, नेरुळ, बेलापूर, तळोजा, जुई गाव, पनवेल, जे.एन.पी.टी आणि मोरा) जेटींचा समावेश आहे. या दोन्ही जलमार्गांकरीता रु.६८६ कोटी एवढा सविस्तर प्रकल्पीय अंदाजखर्च अपेक्षित आहे. जलमार्गांचा सविस्तर अभियांत्रिकी अभ्यास करण्यासाठी महापालिकेमार्फत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी सन २०१९-२० मध्ये **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**पीआरटीएस**

महापालिका क्षेत्रातील अंतर्गत मेट्रो व महामेट्रोच्या नेटवर्कपर्यंत नागरिकांना विना विलंब पोहोचण्यासाठी (Personalised Rapid Transit System) फीडर नेटवर्क म्हणून पीआरटीएस हि योजना टप्प्यांटप्प्याने तयार करण्याचे नियोजन असून यामध्ये १०३ कि.मी. लांबीचे ग्रीड नेटवर्क प्रस्तावित आहे.

या योजनेचा व्यवहार्यता अभ्यास (Feasibility Study) अहवाल व टप्पा- १ मध्ये मध्यवर्ती ठाणे शहर व मुंब्रा-कौसा परिसर अनुक्रमे २४ किमी व १० किमी याप्रमाणे एकूण ३४ किमी नेटवर्कचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याच्या कामासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्तीसाठी प्रक्रिया सुरु आहे. सदरचा प्रकल्प ३ टप्प्यांमध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

**टप्पा -१** : मध्यवर्ती ठाणे शहरामधील २४ कि.मी. व मुंब्रा व कौसा परिसरातील १० कि.मी. याप्रमाणे एकूण ३४ कि.मी. लांबीच्या नेटवर्कचा समावेश आहे. सदर कामी अंदाजे रु. २५०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

**टप्पा -२** : यामध्ये माजिवाडा-मानपाडा व घोडबंदर रस्त्यालगतचा भाग- ४९ कि.मी. लांबी.

**टप्पा -३** : यामध्ये संपुर्ण कोपरी भाग, कळवा, विटावा व मुंब्रा बायपास पर्यंतचा भाग - २० कि.मी. लांबी.

सदर योजना वरील प्रमाणे टप्पेनिहाय हायब्रीड ॲन्यूटी मॉडेल-पी.पी.पी. तत्वावर राबविण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१९-२० मध्ये रु.३० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**खाडी किनारा (चौपाटी ) विकास**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ३२ कि.मी. लांबीचा खाडी किनारा असल्याने सदर खाडीचे जतन, संवर्धन, स्वच्छता, वॉटर स्पोर्टस्, टूरिझम सेंटर्स, कन्व्हेन्शन सेंटर्स, जॉगींग ट्रॅक, प्रॉमिनेड अशा स्वरुपाच्या बाबींचा विकास करणेसाठी १३ झोनमध्ये वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट मास्टर प्लॅन बेल्जियमस्थित मे.ने.पौलीसन वास्तू विशारदाकडून तयार करण्यात आला आहे.

सदर प्रकल्पामुळे मनोरंजनात्मक सुविधा उपलब्ध होणार असून , पर्यटनास चालना, निर्सगसौदर्यांत भर, खाडी किनाऱ्याचे संरक्षण-संवर्धन व सुशोभिकरण, पर्यावरणाचे संतूलन राखण्यास मदत, रोजगार निर्मीती, परिसरातील आर्थिक स्तरांत वाढ होणार आहे.

सदर मास्टर प्लॅन मधील ८ भागांमध्ये वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट ची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत. यापैकी ठाणे स्मार्ट सिटी लि. अंतर्गत पारसिक रेतीबंदर चौपाटी, नागलाबंदर, साकेत -बाळकूम, कळवा-शास्त्रीनगर, कोपरी या ठिकाणी खाडी किनारा-चौपाटी विकसित करण्याचे व सुशोभिकरणाचे काम प्रत्यक्ष सुरु आहे. एकूण ९.६५ कि.मी. लांबीच्या वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट कामांसाठी ठाणे स्मार्ट सिटी लि. अंतर्गत एकूण **रु.२२१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. सदर कामे माहे डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच गायमुख येथे ठाणे महानगरपालिकेच्या निधीतून, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डमार्फत एकूण ०.४८ कि.मी. लांबीचे खाडी किनारा-चौपाटी विकासित करण्याचे व सुशोभिकरणाचे काम सुरू असून प्रथम टप्पात ०.१८ कि.मी. लांबीची खाडी किनारा-चौपाटी विकसीत करण्यात आली असून उर्वरीत कामे टप्पे निहाय माहे डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या निधीतून **रु. ३८.८० कोटी** खर्च होणार आहे. गायमुख विर्सजन घाट विकसित करणे या लेखाशीर्षांतर्गत सन २०१९-२० साठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**इमारती**

- **प्रभाग कार्यालये :**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मुंब्रा येथे प्रभाग कार्यालय बांधण्याचे नियोजन करण्यात आले असून, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात वर्तकनगर प्रभाग समिती कार्यक्षेत्र लक्षात घेता बॅ. नाथ पै रस्त्यालगत निहारिका कॉम्प्लेक्स जवळील भूखंडावर प्रभाग कार्यालय बांधण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **इमारत बांधणे :**

मागील ४ वर्षात एकूण ४ इमारतींचे बांधकाम हाती घेण्यात आले असून त्यापैकी दोन बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत २ इमारतींपैकी पडले गाव येथील नानासाहेब धर्माधिकारी सभागृह व प्रकल्प बाधितांना तात्पुरत्या स्वरुपात निवारा उपलब्ध करुन देण्याकरीता तुलसीधाम येथील धर्मवीर नगर येथे कॉंक्री वॉल या आधुनिक पध्दतीने संक्रमण शिबीर या इमारतीचे बांधकाम सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.७ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **अग्निशमन केंद्र बांधणे :**

मागील ४ वर्षात ठाणे महानगरपालिका क्षेत्रातंर्गत एकूण ६ ठिकाणी अग्निशमन केंद्रासाठी इमारतीची पुनर्बांधणी / नव्याने बांधकाम हाती घेण्यात आले असून, त्यापैकी मुंब्रा येथील अग्निशमन केंद्राची पुनर्बांधणी पूर्ण करण्यात आली असून उर्वरीत ५ वागळे, शिळ, ओवळे, देसाई व पारसिकनगर येथील नव्याने अग्निशमन केंद्राचे बांधकाम सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे.

तसेच बिट फायर स्टेशन अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय परिसरात, पारसिक रेतीबदंर व दिवा परिसरात बिट फायर स्टेशन डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

विकासक तसेच समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून एकूण ३ ठिकाणी अग्निशमन केंद्राचे बांधकाम हाती घेण्यात आले असून त्या अंतर्गत साकेत येथील रुस्तमजी टाऊनशीप अंतर्गत अग्निशमन केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे पातलीपाडा येथील हिरानंदानी इस्टेट व गोल्डन डाईज जंक्शन येथील हरदासनगर लगत अग्निशमन केंद्राचे बांधकाम येत्या आर्थिक वर्षात सुरु होणार आहे.

- **शाळा बांधकाम**

सन २०१५-१६ ते २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण ८ शाळांचे बांधकाम हाती घेण्यात आले असून, त्यापैकी ३ शाळांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत ५ शाळांचे बांधकाम सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **दवाखाने बांधकाम :**

सन २०१५-१६ ते २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण ५ दवाखान्यांचे नुतनीकरण / नव्याने बांधकाम हाती घेण्यात आले असून त्यापैकी ३ दवाखान्याचे नुतनीकरण / बांधकाम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित २ आरोग्य केंद्राचे नव्याने बांधकाम सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच मुंब्रा-कौसा डायलेसीस सेंटर तयार करण्यात येत आहे. यासाठी **रु.६ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **श्रीमती आनंदीबाई जोशी हॉस्पीटल :-**

वर्तकनगर येथील आनंदीबाई जोशी रुग्णालयाची इमारत धोकादायक झाल्याने सदर इमारतीची पीपीपी तत्वावर पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. यामध्ये तळ अधिक ७ मजल्याची इमारत प्रस्तावित असून (तळ +३) मजले रुग्णालयाकरीता राखीव ठेवून उर्वरीत ४ ते ७ मजले विकासकाकरीता ठेवण्यात येणार आहेत. त्यामध्ये सोयीसुविधांनयुक्त डायग्नोस्टीक सेंटर किंवा अशा प्रकारची समकक्ष वैद्यकीय सेवा परिसरातील नागरिकांना उपलब्ध करुन देण्याचा महापालिकेचा मानस आहे.

- **बस डेपो विकसीत करणे :**

मागील ४ वर्षात एकूण ३ ठिकाणी मुल्लाबाग, ओवळा व लोकमान्यनगर बस स्टॉप येथे डेपो विकसित करण्याची कामे हाती घेण्यात आली असुन त्यापैकी प्रथम टप्प्यातील मुल्लाबाग व ओवळा बाग येथील बस डेपोचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून द्वितीय टप्प्यातील बांधकाम सन २०१९-२० या आर्थिक वर्षात करण्यात येणार आहे. तसेच लोकमान्यनगर बस डेपोचे नुतनीकरण मार्च २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच मुल्लाबाग डेपोकरीता **रु.१.७८ कोटी** व ओवळा डेपोकरीता **रु.१.७४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **मार्केट बांधणे**

वर्तकनगर म्हाडा लेआऊट येथील भूखंडावर पीपीपी तत्वावर ८९१६.२७ चौ.मी क्षेत्रावर तळ अधिक ८ मजल्याचे वाणिज्य संकुल उभारण्यात येणार असून ३ रा मजला पार्किंगकरिता व उर्वरित मजले वाणिज्य वापराकरिता उपलब्ध होणार आहेत. सदर इमारतीचे बांधकाम सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **पार्किंग प्लाझा**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये काही मुख्य रस्त्यांवर पार्किंगचे प्रमाण जास्त असल्याने सदर रस्त्यांवरील वाहतूक कोंडी समस्या दूर करण्याच्या दृष्टीने प्रामुख्याने नौपाडा-वागळे येथे मुख्य रस्त्यालगत स्लॅब टाकून त्यावर पार्किंग व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले असून त्याअंतर्गत मागील ४ वर्षामध्ये ३ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच नौपाडा परिसरातील जास्त वर्दळ असलेले क्षेत्र गोखले रोड येथील परिसरात पार्किंग व्यवस्था उपलब्ध नसल्याने शाहू मार्केट येथील जुनी इमारत पाडून त्याठिकाणी नवीन इमारतीसह पार्किंग प्लाझा तयार करण्यात येत आहे. सदर ठिकाणी ४५० दुचाकी करिता व ३२० चारचाकी करीता पार्किंगची व्यवस्था उपलब्ध होणार आहे. सदरचे बांधकाम सन २०२०-२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.७ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **हज हाऊस :**

मुंब्रा येथे हज कमिटी ऑफ इंडिया ( केंद्र शासनाची वैधानिक संस्था) व ठाणे महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हज हाऊस बांधण्याचे प्रस्तावित असून यासाठी रु. १० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

- **गोल्डन डाईज जंकशन येथे ध्वजस्तंभ उभारणी**

ठाणे शहराच्या सांस्कृतिक व राष्ट्र-अभिमान या परंपरांमध्ये भर पडावी म्हणून सन २०१७-१८ मध्ये गोल्डन डाईज जंकशन येथे ३०.५ मीटर लांबीचा फ्लॅग मास्ट पोल असलेल्या स्तंभावर २० फूट बाय ३० फूट आकाराचा राष्ट्रीय ध्वज उभारण्यात आला असून परिसर सुशोभिकरण करण्यात आला आहे.

- **एकात्मिक तलाव पुनरुज्जीवन व सौंदर्यीकरण कार्यक्रम :**

ठाणे शहर हे तलावांचे शहर असून, यामध्ये एकूण ३८ तलावांच्या संवर्धन व सुशोभिकरणासाठी तरतूद करण्यात येते.

**तलाव पुनरुज्जीवन :-** गेल्या चार वर्षात तलाव पुनरुज्जीवन शिर्षकाअंतर्गत सर्व तलावांमधील पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रोबायोटिक प्रक्रिया, एरिएशन यंत्रणा, फाऊंटेन्स्, निर्माल्य कलश, बोटी इत्यादी सुविधा तसेच सणांच्या कालावधीत तलावांचे प्रदुषण रोखण्यासाठी कृत्रिम तलाव, निर्माल्य व्यवस्थापन, घाट दुरुस्ती, दैनंदिन साफसफाई, फेंन्सींग याप्रमाणे सुविधा पुरविण्यात आल्या. गेल्या ४ वर्षात तलाव पुनरुज्जीवन या लेखाशिर्षकाअंतर्गत रु.७.७० कोटी एवढा खर्च करण्यात आला आहे. सन २०१९-२० साठी रु.८ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**तलाव सुशोभिकरण :-**

सन २०१४-१५ मध्ये शिवाजीनगर तलाव, व सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये ब्रम्हाळा तलाव, कचराळी तलाव, हरीओमनगर तलाव, सन २०१६-१७ मध्ये सिध्देवर तलाव यांची सुशोभिकरणाची कामे पुर्ण करण्यात आली.

तलाव सुशोभिकरणाअंतर्गत नागरिकांकरीता आरोग्य वर्धक - मनोरंजनपर सुविधा, सुरक्षितता, जल परिसर संस्थेचा विचार करुन सन २०१७-१८ मध्ये एकूण रु.३६ कोटीची तरतूद केली असून त्यापैकी १५ तलावांचे काम टप्पे निहाय प्रगतीपथावर आहे.

या व्यतिरिक्त रायलादेवी तलाव व जोगीला तलावाच्या संवर्धन व सुशोभिकरणाची कामे प्रस्तावित करण्यात आली असून पुढील प्रक्रिया सुरु आहे. यासाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**आरक्षित भुखंड विकसित करणे**

सन २०१५-१६ ते २०१८-१९ या वर्षात महापालिकेच्या आरक्षित भूखंडावर स्थानिक नागरिकांना उपलब्ध होणा-या सुविधेच्या दृष्टीकोनातून एकूण ५ ठिकाणी - काशिश पार्क येथे अद्ययावत व्यायामशाळा, ढोकाळी येथे स्वामी कृपा संकुल येथे सुविधा भूखंडावर जेष्ठ नागरिक केंद्र, हाजुरी येथे एल्डर्स पॅराडाईज, घोडबंदर येथील वेदांत हॉस्पीटल शेजारी सुविधा भुखंडावर आगरी-कोळी भवन व विहंग व्हॅली जवळील दामजी-सामजी विकासकाच्या सुविधा भुखंडावर जेष्ठ नागरिक भवन उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी

दोन ठिकाणी कशिश पार्क येथील व्यायामशाळा व ढोकाळी येथील जेष्ठ नागरिक केंद्राचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**स्मशानभूमी व कब्रस्तान विकास**

मागील ४ वर्षामध्ये अस्तित्वातील ७ स्मशानभूमी /कब्रस्तानचे नुतनीकरण व एक नव्याने कब्रस्तान विकसित करण्याची कामे हाती घेण्यात आली असून त्याअंतर्गत ३ स्मशानभूमीचे नुतनीकरण व मुंब्रा येथील मित्तल ग्राऊंड लगत ठामपाच्या आरक्षित भूखंडावर २०,००० चौ.मी. क्षेत्रामध्ये नव्याने कब्रस्तान / दफनभूमी विकसीत करण्यात आली आहे.

सन २०१८-१९ मध्ये मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील मित्तल ग्राऊंण्ड जवळ आरक्षीत भुखंडावरील कब्रस्थान / दफनभुमी पूर्णत्वास येणार आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात प्रामुख्याने कळवा - मनिषानगर, मुंब्रा-अग्निशमन केंद्र, डायघर येथील अस्तित्वातील स्मशानभूमीचे व हाजुरी येथील कब्रस्तानचे सर्वांगीण विकास करण्याचे काम हाती घेण्यात आले असून सदरचे काम सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**डायघर एकात्मिक विकास प्रकल्प**

डायघर परिसरात मुलभूत सुविधा विकसित करण्याच्या दृष्टिकोनातून प्रामुख्याने रस्ते, शाळा , आरोग्य केंद्र, उपप्रभाग कार्यालये तसेच खेळांसाठी आरक्षित असलेले मैदान विकसित करणे इ.सह सर्व कामांचे एकत्रितपणे नियोजन करुन सन २०१८-१९ मध्ये डायघर एकात्मिक विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत टप्पा क्रमांक १ व २ अंतर्गत एकूण रु.३५.७८ कोटी एवढया रकमेची कामे मंजूर करण्यात आली आहे.

**बी.एस.यु.पी टप्पा- १, ३ व ४**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात बी.एस.यु.पी योजने अंतर्गत गरीब नागरिकांना डी.पी.आर क्रमांक १ , २ , ३ व ४ मिळून एकूण ९ ठिकाणी ६३४३ सदनिकांचे बांधकाम व पायाभूत सुविधा पुरविण्याचे अंतर्भूत आहे.

सन २०१५-१६ पूर्वी २६२५ सदनिकांचे बांधकाम पुर्ण होऊ लाभार्थ्यांना राहण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. सन २०१५-१६ ते २०१८-१९ पर्यंतच्या कालावधीत उर्वरीत ३७१८

सदनिकांची कामे प्रगतीपथावर होती, त्यापैकी टप्या टप्प्याने ११११ सदनिका या लाभार्थ्यांना वाटप करण्यात आल्या आहेत. उर्वरीत २५९९ सदनिकांची कामे माहे मार्च २०१९ अखेर पुर्ण होणार असुन त्यापैकी १८४७ सदनिका या प्रकल्प बाधित (PAP) लाभार्थ्यांना आणि उर्वरीत ७५२ सदनिका या बी.एस.यु.पी लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहेत. सदर योजना पूर्ण करण्याच्या उद्देशाने सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पात **रु.७७.२५ कोटी** वाढीव तरतुदीसह एकूण **रु.१७८.३९ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**एकात्मिक प्रभाग विकास कार्यक्रम**

प्रभागाचा एकत्रित विकास करण्याच्या दृष्टीने विविध कामांकरीता सदरचे लेखाशिर्ष निर्माण करण्यात आले होते. सन २०१८-१९ पर्यंत या प्रकल्पाअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामांसाठी पुढील आर्थिक वर्षात रु.२० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली असून यापुढे सदरची योजना बंद करण्यात येत आहे.

**पाणी पुरवठा**

ठाणे महापालिका पाणी पुरवठा विभागामार्फत मागील ४ वर्षात खालील प्रमाणे कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात आली आहेत.

- पाणी पुरवठा विभागामार्फत जलवाहिन्या अंथरणे ,जलकुंभ व संप पंप बांधणे, पाणी पुरवठा वितरण व्यवस्था विस्तार व मजबुतीकरण या अंतर्गत एकूण रु.४५८ कोटी रकमेची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी मागील ४ वर्षात रु.७९ कोटी खर्च झाला आहे.

- रस्ता रुंदीकरणात बाधित होणा-या नविन वाढणा-या शहरासाठी तसेच अस्तित्वातील जुन्या जलवाहिन्या बदलणे याबाबत पाणी पुरवठा विभागाने एकूण हाती घेण्यात आलेल्या ३३० कि.मी. लांबीपैकी ४० कि.मी. लांबीच्या पाईपलाईन नविन टाकण्यात आलेल्या आहेत.

- ठाणे महापालिका निधीतून एकूण ३१ जलकुंभ (८१.७५ एम.एल. क्षमता) प्रस्तावित होते. त्यापैकी २ जलकुंभ कार्यान्वीत (५ एम.एल क्षमता) करण्यात आले आहेत. तसेच विकासकामार्फत एकूण १२ जलकुंभ (२७.५ एमएल क्षमता) हाती घेण्यात आले असून यापैकी ५ जलकुंभ (१० एम.एल. क्षमता) कार्यान्वित करण्यात आले आहेत.

- ठाणे महापालिका निधीतून एकूण १९ संप व पंप हाऊस (क्षमता २३.४५ एम.एल.) चे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच खाजगी विकासकामार्फत २ संप व पंप हाऊस (०.७ एम.एल. क्षमता) हाती घेऊन पूर्ण करण्यात आले आहे.

**मार्च २०१९ मध्ये पूर्णत्वास येणारे प्रकल्प पुढीलप्रमाणे.**

- लोकमान्यनगर येथील विठ्ठल क्रिडा मंडळ येथे २ दश लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ व २ लक्ष लिटर क्षमतेचा संप
- वागळे इस्टेट येथील जॉन्सन येथे २.५० दश लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ
- घोडबंदर येथील आनंदनगर येथे २ दश लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ व ५० लक्ष लिटर क्षमतेचे संप
- सिध्दांचल येथे १.५० दश लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ व ५० लक्ष लिटर क्षमतेचा संप
- कळवा मनिषा नगर येथे २.५० दश लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ

**पाणी वितरण व्यवस्था व रिमॉडेलिंग :**

ठाणे महानगरपालिकेच्या वितरण व्यवस्था विस्तार व मजबुतीकरणाअंतर्गत यापुर्वी हाती घेण्यात आलेल्या कामांपैकी काही कामे सन २०१९-२० मध्ये पुर्ण होणार असून उर्वरित कामे सन २०२१-२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पांअंतर्गत प्रामुख्याने १) घोडबंदर रोड रिमॉडेलिंग एकूण अंदाजखर्च रु. ५० कोटी २) कळवा विभाग रिमॉडेलिंग अंदाजखर्च रु.२५ कोटी ३) मुंब्रा - दिवा रिमॉडेलिंग रु. १९६ कोटी इत्यादी मुख्य कामांचा तसेच इतर भागातील काही प्रकल्पांचा समावेश आहे. सन २०१९-२० मध्ये या कामासाठी **रु.८० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**पाणी लेखा परिक्षण व स्काडा तसेच ऊर्जा लेखापरिक्षण :**

ठाणे महानगरपालिकेमार्फत पाणी लेखापरिक्षणासाठी स्काडा यंत्रणा उभारण्यात येत असून सदरचे काम मार्च २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. स्काडा यंत्रणा उभारणीमध्ये उद्‌भवापासून जलकुंभापर्यंत येणा-या पाण्याचे लेखापरिक्षण करण्याबरोबरच पाणी पुरवठयाच्या इतर बाबी जसे की पाणी पुरवठयाचा प्रवाहगणना, पाण्याचा दाब , पाण्याची गुणवत्ता याची ऑनलाईन माहिती व नियंत्रण मुख्य नियंत्रण कक्षामार्फत करण्यात येणार आहे. सदर

प्रकल्पासाठी सन २०१९-२० चे अर्थसंकल्पात **रु.२० कोटी** एवढी तरतूद करण्यात आली आहे.

ऊर्जा लेखापरिक्षणाबाबत पाणी पुरवठयाच्या यंत्रणेतील पंपांचे व विद्युत उपकरणांचे लेखापरिक्षण व पुनर्वसन कामे करणेबाबत ESCO मॉडेलवर निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे. सन २०१९-२० चे अर्थसंकल्पात **रु.१ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**मलनि:सारण व जलनि:सारण**

**जेएनएनयुआरएम योजना पूर्णत्वास नेणे :**

जेएनएनयुआरएम भुयारी गटार योजना टप्पा क्र. १, २ व ३ अंतर्गत सन २००९ पासून प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. सदर योजनेमध्ये २१० कि.मी. लांबीची मलवाहिनी टाकणे, २० मलउचंदन केंद्र व ६ मलप्रक्रिया केंद्राचे बांधकाम हाती घेण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाअंतर्गत सन २०१५-१६ या वर्षापर्यंत ६२ टक्के काम पुर्ण करण्यात आले होते.

सदर योजनेअंतर्गत काही भागातील रस्ते खोदुन मलवाहिनी टाकणे शक्य नसल्याने महापालिका निधीमधून ट्रेंचलेस तंत्रज्ञान वापरुन मलवाहिनीच्या गॅप कनेक्टीव्हीटीचे काम पुर्णत्वास नेण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरीत प्रकल्पापैकी सन २०१८-१९ पर्यंत सदर योजनेचे ९८ टक्के काम पुर्ण झाले असून दोन मलप्रक्रिया केंद्र व ९ मलउदंचन केंद्र कार्यान्वीत करण्यात आले असून उर्वरीत मलप्रक्रिया केंद्र व मलउदंचन केंद्र मार्च २०१९ अखेर कार्यान्वीत होतील. त्यासाठी टप्पा क्र.१, २ व ३ करीता एकूण **रु.२९.६३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **ड्रेनेज हाऊस कनेक्शन जोडण्याचे उद्दिष्ट :**

निवासी / अनिवासी संकुलाचे / सदनिकांचे / झोपडी धारकांचे ड्रेनेज कनेक्शन मुख्य योजनेत जोडण्यासाठी रु. ११० कोटी रकमेची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आलेली आहेत. ठाणे महानगरपालिका व सामाजिक संस्थेच्या सहकार्याने "एक घर एक शौचालय" अभियान राबविण्यात येत असून, त्या अंतर्गत मागील ४ वर्षात सुमारे १७०० ड्रेनेज हाऊस कनेक्शन करण्यात आलेले आहेत. शहरी भाग, वागळे इस्टेट, मुंब्रा, कळवा, कोलशेत, ढोकाळी या सर्व भागातील ड्रेनेज कनेक्शनचे सुमारे १०,००० निवासी / अनिवासी संकुलाचे /

सदनिकांचे / झोपडी धारकांचे हाऊस कनेक्शन जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. त्यासाठी **रु.४० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **मलप्रक्रिया केंद्राची क्षमतेचा पुरेपूर उपयुक्तता होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे :**

जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत कोपरी येथे १२० द.ल.लि. क्षमतेचे व मुंब्रा येथे ३२ द.ल.लि. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. तसेच मार्च २०१९ अखेर विटावा, खारेगाव, माजिवडा व कोलशेत या ठिकाणी एकूण १०० द.ल.लि. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र कार्यान्वीत होत आहेत. सन २०१४-१५ पर्यंत मलप्रक्रिया केंद्रामध्ये २० द.ल.लि.मलजलावर प्रक्रिया होत होती. त्यात मागील ४ वर्षात वाढ होऊन ७४ द.ल.लि.मलजलावर प्रक्रिया करण्यात येत आहे. या सर्व मलप्रक्रिया केंद्राच्या क्षमतेऐवढे मलजल प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट सन २०२१ पर्यंत आहे. त्यासाठी **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

तसेच कोपरी येथील मलप्रक्रिया केंद्र येथे पी.पी.पी. तत्वावर मलजलापासून विज निर्मिती प्रकल्प व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

- **अमृत योजने अंतर्गत घोडबंदर रोड भागात भुयारी गटार योजना राबविणे :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर रोड परिसरात भुयारी गटार योजना अस्तित्वात नसल्याने भुयारी गटार योजना टप्पा क्र.४ अंतर्गत घोडबंदर रोड परिसरात सुमारे १० लक्ष लोकसंख्येकरीता ही योजना हाती घेण्यात आली आहे. सदर योजनेस अमृत अभियाना अंतर्गत राज्यशासनाकडून मंजूर १७९.०१ कोटी रकमेच्या सुमारे ५०% अनुदान प्राप्त होणार आहे. सन २०१८-१९ या वर्षात सदर योजनेचे काम १५% पूर्ण झालेले असून, पुढील २ वर्षात ही योजना पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. या योजनेअंतर्गत ५९ द.ल.लि. व ७ द.ल.लि. क्षमतेचे २ मलप्रक्रिया केंद्र, ५ मलउदंचन केंद्र, ९२ कि.मी. लांबीची मलगुरुत्ववाहिनी व २९२२ हाऊस कनेक्शन कामाचा अंतर्भाव आहे. त्यासाठी **रु.८५.७८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **दिवा शिळ परिसरात भुयारी गटार योजना राबविणे (टप्पा ५) :**

दिवा शिळ भागात मोठया प्रमाणात नागरी वसाहती असून, दिवसेंदिवस या भागात नागरिकरण वाढत आहे. या भागात भुयारी गटार योजना अस्तित्वात नसल्याने, सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने या भागात सुध्दा सदर योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत १५२ कि.मी. लांबीची मलवाहिनी, १३ मलउदंचन केंद्र , ५ मलप्रक्रिया केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे.

या योजनेस मा.महासभेने मान्यता दिली असून, योजनेस शासनाचे अर्थसहाय्य मिळविण्याकरीता महापालिकेकडून प्रयत्न करण्यात येत आहे. या योजनेस अंदाजे रु.२३५ कोटी खर्च येणार आहे. या योजनेच्या एकूण व्याप्तीपैकी दिवा-शिळ व ग्रामीण परिसरातील रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली असल्याने, मलवाहिनीसाठी रस्त्याची पुन्हा तोडफोड होऊ नये या करीता रस्त्याच्या कामासह मलवाहिनी टाकण्याचे काम करण्यात येत आहे. सुमारे ५० ते ६० रस्त्यांवर मलवाहिनी टाकण्याचे काम करण्याचे प्रस्तावित आहे. सदरचे काम या आर्थिक वर्षात सुरु करण्यात येत असून मे २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **प्रक्रिया झालेल्या सांडपाण्याचा वापर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे :**

मलप्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर शौचालयाचे फ्लशींग, बगीचा, इमारत बांधकाम इत्यादी कामांसाठी करता येऊ शकतो. ठाणे महापालिका क्षेत्रात विविध गृहसंकुलात विकासकांनी मलप्रक्रिया केंद्र बांधलेले असून, त्याची संख्या सुमारे ११० आहे. या गृहसंकुलात मलप्रक्रिया केंद्रातील प्रक्रिया केलेल्या निर्जंतुक केलेल्या सांडपाण्याचा वापर नागरिकांकडून / सोसायटीकडून शौचालयाचे फ्लशींगसाठी व संकुलनातील बगीचाकरीता होत असतो. मात्र काही सोसायटींकडून त्याचा वापर होत नसल्याने अशा गृहसंकुलनावर सक्ती करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे उद्दिष्ट तसेच ज्या मोठया संकुलनामध्ये मलप्रक्रिया केंद्र नाहीत अशा सोसायटयांना / नागरिकांना मलप्रक्रिया केंद्र बांधून निर्जतुंक सांडपाण्याचा वापर करण्याकरीता प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने मालमत्ता करात सूट देणे किंवा पाणी दरात सूट देणेसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याचे दृष्टिने व्यवहार्यता अभ्यास (Feasibility Studies) सुरु करण्यात आला आहे.

- **शौचालय बांधणे व दुरुस्ती**

मागील ४ वर्षात शौचालय बांधणे अंतर्गत वस्ती शौचालय, महिलांसाठी शौचालय व अत्याधुनिक वातानुकुलित शौचालयाचे नव्याने बांधकाम / पुनर्बांधणी / नुतनीकरण या अंतर्गत एकूण ३६९ युनिट ( २०३६ सीट्स) चे बांधकाम हाती घेण्यात आले असून त्या अंतर्गत ८० युनिट्स (७९३ सीट्सचे ) बांधकाम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित २८९ ( १२४३ सीट्स) चे बांधकाम २०१९-२० मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच शौचालयांच्या दुरुस्ती अंतर्गत १०५५ युनिट्स (६७१६ सीट्स) ची दुरुस्ती हाती घेण्यात आली असून त्या अंतर्गत ३२९ युनिट्स ( ३८२९ सीट्स) ची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली असून उर्वरित ७२६ युनिट्स (२८८७ सीट्स ) ची दुरुस्ती २०१९-२० मध्ये करण्यात येणार आहे.

मागील ४ वर्षात शौचालय बांधणे व दुरुस्ती अंतर्गत एकूण रु१०६.५० कोटीचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून त्यापैकी आतापर्यंत रु.५१.११ कोटी एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून या क्षेत्रात तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात शौचालय बांधणे या लेखाशीर्षातर्गत **रु. १० कोटी** व शौचालय दुरुस्तीमध्ये **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **नाले बांधकाम :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण ७२ मुख्य नाले असुन त्याची एकूण लांबी १५३ कि.मी. आहे. ठाणे महानगरपालिकेने सन २०१४ पर्यंत सुमारे ७२.६२ कि.मी. लांबीचे नाल्यांचे बांधकाम आर.सी.सी. पध्दतीने केलेले आहे. मागील ४ वर्षात म्हणजे सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या वर्षात एकात्मिक नाले विकास कार्यक्रमाअंतर्गत एकूण ३० कि.मी. लांबीमध्ये आर.सी.सी. / सिमेंट कॉंक्रीट पध्दतीने नाल्याचे बांधकाम हाती घेण्यात आले असून, त्यापैकी ११ कि.मी. लांबीमध्ये नाल्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

वरील प्रमाणे एकात्मिक नाले विकास प्रकल्पाअंतर्गत मागील ४ वर्षामध्ये हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात आल्यामुळे

अस्तित्वातील नाल्यांपैकी ८३.६२ कि.मी. लांबीमध्ये पक्क्या स्वरुपाचे आरसीसी / सीसी नाले तयार करण्यात आले आहेत. यासाठी ४ वर्षात एकूण **रु.८२.५५ कोटी खर्च** झाला आहे. उर्वरीत रु.१६० कोटी रकमेचे नाल्याचे बांधकाम टप्प्या टप्प्यात सन २०१९-२० व सन २०२०-२१ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात **रु.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**विद्युत**

**मागील ४ वर्षात पूर्ण करण्यात आलेले प्रकल्प**

- ESCO च्या माध्यमातून महापालिकांच्या कुठलाही भांडवली व महसुली खर्च न करता ७५०० एल.ई.डी दिवे लावण्यात आले असून यामधील वीज बचतीचा १० टक्के हिस्सा महापालिकेस मिळत आहे.
- ठाणे शहराअंतर्गत रस्त्यावर Free Wifi सुविधा व १०० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.

- **सोलार प्रकल्प**

महापालिकेच्या १० मेगा वॅट क्षमतेच्या सोलार प्रकल्प यापुर्वीच हाती घेण्यात आला असून त्या अंतर्गत २० किलोवॅट क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वीत झालेला आहे एकूण ६.५ मेगावॅट सोलार यंत्रणा उभारणीचे काम प्रगतीपथावर असून जून २०१९ अखेर पर्यंत कार्यान्वीत करण्यात येणार आहे. यामध्ये महापालिका निधीतून खर्च होणार नाही. तथापि, महानगरपालिकेस महाराष्ट्र विद्युत मंडळाच्या दरापेक्षा कमी दराने वीज उपलब्ध होणार आहे.

- **इलेक्ट्रिकल बस सेवा**

सदरील प्रकल्पामध्ये १ बस पीपीपी तत्वावर प्राप्त झाली आहे व उर्वरीत १०० बसेस २०१९ अखेर मिळणार आहेत. सदरील बसेससाठी महानगरपालिकेस निधी खर्च करावा लागणार नसून प्रत्येक बस मागे दर महिन्याला रु.१०,००० उत्पन्न प्राप्त होणार आहे.

- **एलईडी पथ दिवे**

शहरात एकूण ४०२०० पथ दिवे असून त्यातील २६००० पथ दिवे एलईडी तंत्रज्ञानावर आधारीत बसविण्यात आलेले आहेत. उर्वरीत सोडियम व्हेपर पथ दिव्यांचे परिवर्तन एलईडी पथ दिव्यांमध्ये या वर्षात पूर्ण करण्यात येईल. यामुळे विजेची बचत होणार आहे. त्यासाठी **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**डिस्ट्रिक्ट कूलिंग**

UNEP या युनाईटेड नेशन्सच्या माध्यमातून देशात डिस्ट्रिक्ट कूलिंग हा पायलट प्रकल्प हाती घेण्यात आलेला असून त्यासाठी ठाणे शहराची निवड करण्यात आलेली आहे. यासाठीचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, या प्रकल्पामुळे शहरातील वातानुकूलनासाठी लागणा-या पारंपारिक विजेची बचत होऊन पर्यावरणाचा -हास कमी होण्यास मदत होईल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**आरोग्य सुविधा**

**मागील ४ वर्षात पुर्ण करण्यात आलेले प्रकल्प :-**

- ५ ठिकाणी डायलेसिस सेंटर सुरु करण्यात आले असून सदर सेंटरमध्ये ५० डायलेसिस मशीन बसविण्यात आल्या आहेत. यामध्ये १ वर्षामध्ये ६००० लाभार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.
- सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या कालावधीत महापालिकेचे विविध आरोग्य केंद्रे, प्रसुतीगृहे व रुग्णालयांसाठी अत्याधुनिक क्षकिरण यंत्रे, डायलेसीस सुविधेकरीता लागणारी डायलेसीस मशिन व विविध उपकरणे, रुग्णालयातील प्रसुतीगृह व एन.आय.सी यु कक्षाकरीता लागणारी उपकरणे, कर्करोग निदानासाठी मेमोग्राफी मशिन, कर्करोग निदान केंद्रासाठी अत्याधुनिक उपकरणे तसेच मध्यवर्ती प्रयोगशाळा उभारणेसाठी आवश्यक असलेली उपकरणे खरेदी केलेली आहेत. याकरीता एकूण रु.२१.४५ कोटी इतका खर्च झालेला आहे.
- सी.आर.वाडीया दवाखान्यामध्ये महिलांना गर्भाशयाचा कर्करोग पूर्व तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून एक वर्षामध्ये सुमारे ५०० महिलांनी तपासणी केली आहे.

रुग्णालये उपकरणे खरेदीसाठी **रु.१५ कोटी** व कौसा रुग्णालय उपकरणे खरेदीसाठी **रु.१३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

आरोग्य विभागाकडून सन २०१९-२० मध्ये घेण्यात येणा-या योजना विशेष प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या आहेत.

**छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय**

**पायाभूत सुविधाः-**

रुग्णालयाच्या विविध कक्षांचे नुतनीकरण, बाहयरुग्ण कक्षांचे स्थलांतर, मध्यवर्ती निर्जंतुकीकरण कक्षांचे नुतनीकरण व नियोजन, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी खुले प्रतिक्षालय यासारखी कामे समाविष्ट आहेत. या कामांसाठी मागील ४ वर्षात ७.७२ कोटी रुपये खर्च झाले असून रु.८ कोटीची कामे प्रस्तावित आहेत.

- **सेवा सक्षमीकरण :-**

सन २०१३ मध्ये दररोज ९० रुगण याप्रमाणे वर्षभरात २९०३१ रुग्ण उपचारासाठी दाखल होत होते. त्याचप्रमाणे दैनंदिन सरासरी ९५० प्रमाणे वर्षभरात सुमारे ३ लक्ष बाहयरुग्ण विभागात उपचारासाठी येत असतात. तसेच विविध प्रकारच्या ५८२६०६ तपासण्या केल्या जात होत्या.

सन २०१८ मध्ये दररोज १२० प्रमाणे वर्षभरात ४३३६५ रुघाण भरती होत होते. त्याचप्रमाणे दैनंदिन सरासरी १५३० प्रमाणे वर्षभरात सुमारे ४ लक्ष ७१ हजार बाहयरुग्ण विभागात उपचारासाठी येत आहेत. तसेच वविध प्रकारच्या ९२२३३६ तपासण्या केल्या जात आहेत. अशा रितीने एकूण कामकाजात मोठयाप्रमाणावर वाढ झाली आहे.

- **मॅमोग्राफी मशीन :-**

स्तनाच्या कर्करोगाचे सुरुवातीच्या अवस्थेत निदान करण्यासाठी उपयुक्त असलेली ही मशिन महानगरपालिकेतर्फे खरेदी करण्यात आली असून या मशिनद्वारे एप्रिल २०१८ पासून, आजपर्यंत ६७८ महिलांची तपासणी करण्यात आली आहे.

- **सिटी स्कॅन / एमआरआय उपकरणे :-**

वरील सेवा महापालिका व खाजगी सहभागातुन (PPP) तत्वावर यंत्र उभारणी व संचलन करुन वैद्यकीय महाविद्यालयात ही सेवा सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आजवर ५५६३ सिटीस्कॅन व ३८१८ एम.आर.आय तपासण्या करण्यात आलेल्या आहेत.

**सामाजिक योजना**

- **महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना**

राज्य सरकारद्धारा संचलित केशरी व पिवळे रेशनकार्ड धारक, गरीब व गरजू रुग्णांना प्रत्यक्ष खर्च न करता, विविध प्रकारच्या ९७१ आजारांसाठी वैद्यकीय सोईसुविधा व उपचार उपलब्ध करुन देण्याच्या या योजनेद्धारा आजवर ८७३ इतक्या रुग्णांवर उपचार करण्यात आलेले आहेत. यातील ८०० रुग्णांवरील उपचार मागील १५ महिन्यात करण्यात आलेले आहेत.

वैद्यकीय शिक्षणाचा एक भाग म्हणुन महाविद्यालय व रुग्णालयातर्फे विविध ठिकाणी वैद्यकीय आरोग्य शिबीरे घेतली जातात व त्याद्धारे समाजातील अनेकांपर्यंत रुग्णालयीन सेवा पोहोचते.

- **शैक्षणिक :-**

छत्रपती शिवाजी महाराज रुगणालय हे राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयास संलग्न असून MCI तर्फे प्रथमच न्याय वैद्यकीय शास्त्रात पदव्युत्तर पदवी शिक्षणासाठी मान्यता प्राप्त झाली आहे. यानुसार प्रतीवर्ष ३ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी शिक्षण मिळेल. याव्यतिरिक्त सात विषयांत MCI तर्फे पदव्युत्तर पदवी शिक्षणासाठी लवकरच मान्यता मिळण्याची अपेक्षा आहे.

**घनकचरा व्यवस्थापन**

- **शास्त्रोक्त पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेवाट :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील घनकच-याच्या शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाटीसाठी मौजे डायघर येथे प्रकल्प उभारणेचे काम सुरु असून याद्धारे पहिल्या टप्प्यात ६०० मेट्रीक टन व दुस-या टप्प्यात ६०० मेट्रीक टन असे एकूण १२०० मेट्रीक टन कच-याची विल्हेवाट लावणे या प्रकल्पाद्धारे शक्य होणार आहे. सदर प्रकल्प येत्या १८ महिन्यांत कार्यान्वित होणार आहे. त्यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **बांधकाम कचरा (C & D Waste) प्रक्रिया प्रकल्प :**

बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये महापालिकेमार्फत धोरण तयार करण्यात आलेले असून त्याची अंमलबजावणी करण्यास सन २०१९-२० मध्ये सुरुवात करण्यात येईल. त्या अंतर्गत मोजे डायघर येथे ३०० मेट्रीक टन प्रती दिन क्षमतेचे प्रक्रिया करणारे प्रकल्प येत्या महिन्यापासून सुरु करण्यात येत आहे. त्यासाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **विकेंद्रित पध्दतीने घनकच-याची विल्हेवाट :**

ठाणे महापालिकेचा मोठया प्रमाणात विकेंद्रीत पध्दतीने (निर्मितीच्या ठिकाणी ) ओल्या कच-यावर पक्रिया करणेचा मानस असून त्यानुसार ठिक ठिकाणी एकूण १०० टन ओल्या कच-याच्या विल्हेवाटीकरीता बायोमिथेनायझेशन, बायो-कंपोस्टींग OWC यंत्राचे माध्यमातून ओल्या कच-याची विल्हेवाट लावण्यात येईल.

- **मोबाईल कचरा प्रक्रिया प्रकल्प :**

शहरातील दाट वस्तीच्या ठिकाणी तसेच झोपडपट्टी भागात ओल्या कच-यावर प्रक्रिया करणेसाठी जागेचा अभाव लक्षात घेता तेथे निर्माण होणा-या ओल्या कच-यावर प्रक्रिया करण्यासाठी OWC यंत्र वाहनांवर बसवुन फिरते प्रक्रिया प्रकल्प तयार करण्यात येतील. याकरीता शहरातील झोपटपट्टयांमध्ये स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून घरोघरी वर्गीकृत कच-याचे संकलन करुन ओल्या कच-याची विल्हेवाट, फिरते प्रक्रिया प्रकल्पाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **अत्याधुनिक हस्तांतरण स्थानक :**

घनकच-याची शास्त्रोक्त पध्दतीने वाहतूक करणेसाठी सी पी. तलाव येथे अत्याधुनिक हस्तांतरण स्थानक पुढील दोन महिन्यात कार्यान्वित करण्यात येईल. यामुळे शहरातील घनकच-याची वाहतूक बंद स्वरुपातील मोठया क्षमतेच्या वाहनांद्वारे केल्यामुळे प्रदुषण कमी होणेस मदत होईल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **रोबोटीक मशीन :**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अत्याधुनिक रोबोटीक मशीन खरेदी करण्यात आली असून सदर मशीनचा वापर अडचणीच्या जागेतील सफाई, नाले सफाई होत आहे.

- **स्वच्छ भारत अभियान :**

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहर कचरामुक्त करण्यासाठी एक टन क्षमतेचे १५० कंटेनर व २२५ कचराकुंडी (लिटरबिन्स) कचरा संकलन करण्यासाठी खरेदी करण्यात आलेले आहेत. तसेच घरोघरी जावून कचरा संकलन करण्यासाठी ४ चाकी व ६ चाकी घंटागाडया आणि कॉम्पॅक्टर अशी एकूण २०० वाहने भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहेत.

- **स्वच्छ सर्व्हेक्षण :**

स्वच्छ सर्व्हेक्षण अंतर्गत लोक सहभागास अधिक महत्व देण्यात आलेले आहे. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागात तक्रार निवारण कक्ष सुरु करण्यात येईल. याकरीता Dedicated Help Line च्या माध्यमातून नागरिक स्वच्छता विषयक तक्रारी करु शकतील. प्राप्त तक्रारीचे निराकरण जलद गतीने होणेच्या दृष्टीने शहरातील कचरा वेचकांचे प्रभाग समिती निहाय पथक तयार करुन तक्रारीचे निराकरण करण्यात येईल. त्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **दिवा येथील जुन्या क्षेपणभूमींचे कॅपींग :**

घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ मधील तरतुदीनुसार शहरातील जुन्या क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करणे महापालिकेस बंधनकारक आहे. त्या अंतर्गत प्रथम टप्प्यात दिवा खर्डी भागातील सद्यस्थितीत बंद असलेले तीन घनकचरा विल्हेवाटीचे टिक ठिकाणी कॅपींग पध्दतीने बंद करुन तेथे सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून हिरवळ बाग तयार करणेचा मानस आहे. त्यासाठी **रु.१५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **खाजगीकरणातून रस्ते व प्रसाधनगृह साफसफाई :**

शहरातील मुख्य रस्त्यांच्या साफसफाईची गुणवत्ता वाढविण्याकरीता सफाई कामगारांना Human Efficiency Tracking System व प्रसाधनगृह साफसफाईची गुणवत्ता वाढविणेसाठी Real Time Mobile Application द्वारे पर्यवेक्षण करण्यात येणार आहे.

**वृक्ष लागवड**

हरीत ठाणे कल्याणासाठी वृक्षप्राधिकरण विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. मागील ४ वर्षात प्रामुख्याने खालील योजना पूर्ण करण्यात आल्या आहेत.

- सन २०१५-१६ ते २०१६-१७ या कालावधीमध्ये एकूण ५ लक्ष वृक्ष लागवड करण्यात आली.
- रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित झालेल्या सुमारे १६०० वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले.
- पर्यावरण प्रबोधन, सर्वंधन यासाठी वृक्षवल्ली प्रदर्शन सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये आयोजीत करण्यात आले. सदरील प्रदर्शनास ११७००० नागरिकांनी भेट दिली. सन २०१९-२० मध्ये

वृक्षवल्ली प्रदर्शनाकरीता **रु.७५ लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

- जैवविविधता उद्यान : कासारवडवली इथे जैवविविधता उद्यान तयार करण्यात आले यामध्ये ५०० हून अधिक प्रजातींच्या वनस्पतींची लागवड करण्यात आली.
- खारफुटी संवर्धन प्रकल्पातंर्गत ठाणे शहरातील खाडी किनारी सुमारे १.५० लक्ष कांदळवनाचे रोपण, निगा व देखभाल करण्यात आली आहे.
- वृक्ष संवर्धन करण्यासाठी एक नग ट्री ट्रान्सप्लान्ट मशीन वृक्षपुनर्रोपणासाठी खरेदी केले आहे.

**शहरी वनीकरणे**

जपानी उद्यान तज्ञ Akira Miyawaki यांच्या शहरी वनीकरण (City Forest)या संकल्पनेवर आधारित पर्यावरणाच्या दृष्टीने झाडांचे महत्व लक्षात घेता शहरातील मोकळ्या तसेच आरक्षित भुखंडावर जास्तीत जास्त वृक्षांची लागवड करुन शहरी वनीकरण (City Forest) तयार करण्याचे नियोजीत आहे. यामध्ये प्रामुख्याने (वड, पिंपळ, कडुलिंब, सप्तपर्णी, कांचन, बहावा, बदाम, महोगणी, करंज) अशा प्रकारच्या वृक्षप्रजातींची लागवड करण्यात येणार आहे.

वृक्ष / झाडे लागवड याकरीता सन २०१९-२० मध्ये २ लक्ष वृक्ष लागवड करण्यात येणार असून याकरीता **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

तसेच शहरातील खाडीलगत खारफुटीची लागवड करुन हरीत क्षेत्र वाढविण्याचे नियोजीत असून याकरीता अंदाजे **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**उद्यान विकास**

**संजीवनी उद्यान :-** उथळसर प्रभागातील ब्रम्हाळा तलावालगत उद्यानासाठी आरक्षित भुखंडावर अंदाजे ६७८४ चौ.मी. क्षेत्रावर ओषधी वनस्पतींचे उद्यान विकसित करण्यात येणार आहे.

मानवी जीवनातील विविध व्याधी दूर करण्याची औषधी वनस्पतींची क्षमता याबाबतची माहिती या उद्यानात दिली जाईल. औषधी वनस्पतींची लागवड, निगा व देखभाल याबाबत मार्गदर्शन या उद्यानात दिले जाईल. उद्यानाला भेट देणा-या विद्यार्थ्यांना व नागरीकांना औषधी वनस्पतींची ओळख व इतर माहिती देण्यासाठी

मार्गदर्शकाची नेमणूक करण्यात येईल. यासह उद्यानात पिण्याचे पाणी, टॉयलेट, बैठक व्यवस्था अशा इतर मूलभूत सुविधाही पुरविल्या जातील.त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **गुलाबपुष्प उद्यान :**

वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत हिरानंदानी मेडोजजवळील भुखंडावर गुलाबाच्या विविध जातींची लागवड केली जाणार आहे. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **सायन्स ॲंड नॉलेज पार्क :**

माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत वाघबिळ येथे उद्यान आरक्षित भुखंडावर नॉलेज डिस्ट्रक्ट, प्लॅनेट झोन, सायन्स झोन, चेस पार्क, क्वीझ झोन, स्पीकर कॉर्नर, योगा झोन, म्युझिकल फाऊंटन इत्यादी अनेक नावीन्यपूर्ण बाबींचा व माहितीचा समावेश असलेले उद्यान विकसित करण्याचे नियोजित आहे. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **चिल्ड्रन मिनी ट्रेन :**

माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती मधील कासारवडवली उद्यान, कोपरी प्रभाग समिती मधील सर्वोदय उद्यान, नौपाडा मधील गोदावरी आर.जी. प्लॉट, वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत कै.प्रमोद महाजन निसर्ग उद्यान व सिध्दांचल गार्डन येथील उद्यानात लहान मुलांसाठी मिनी ट्रेन बसविण्यात येणार आहे यासाठी " उद्यानामध्ये खेळणी बसविणे " या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.१.५० कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

- **ग्रीन वॉल :**

कॅडबरी जंक्शन येथे ९६७ चौ.मी. क्षेत्रफळाअंतर्गत ग्रिन वॉल - ग्रिन लंग्स् विकसित करण्यात येणार आहे. या संकल्पनेकरीता कॅडबरी जंक्शन उड्डाणपूल, नितिन कंपनी जंक्शन उड्डाणपूल, तिन हात नाका जंकशन उड्डाणपूल, माजिवडा परिसरातील उड्डाणपूलाचे पिलर इ. ठिकाणी प्रस्तावित आहेत. सदरची कामे उद्यान विकसीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात येणार असून त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**पर्यावरण संवर्धन**

सन २०१५ ते २०१९ या कालावधीत घनकच-याचे विविध प्रकारानुसार (Constituents ) व्यवस्थापनाचे विविध प्रकल्प केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार सुरु केले असून ते पुढीलप्रमाणे

१. **निर्माल्यापासून खत निर्मिती**
२. **हरित कच-यापासून जळाऊ इंधन**
३. **सुका कचरा संकलन केंद्र**
४. **हॉटेल वेस्ट टू बायोगॅस**
५. **बायोमेडीकल वेस्ट प्रक्रिया**
६. **ई वेस्ट प्रकल्प**
७. **थर्माकोल वेस्ट प्रकल्प**

- **तीन हात नाका हवा सर्व्हेक्षण केंद्र :**

ठाणे महापालिका क्षेत्रात ६ ठिकाणी वेदर स्टेशन उभारलेले आहेत. ज्यापासून हवामानाची माहिती मिळते. तीन हात नाका येथे हवा प्रदुषण Real Time Data मोजणारी यंत्रणा उभारण्यात आली आहे. यावरुन Mobile App द्वारे नागरिकांना हवा प्रुदषणाची आणि वातावरणाची माहिती मिळते.

तलाव संवर्धन योजनेद्वारे ठाणे शहरातील ३५ तलावांपैकी १५ तलावांचे काम प्रगती पथावर आहे. यामध्ये गाळ काढणे, लॅण्ड स्केलिंग, शौचालय व प्रदुषण नियंत्रण संबंधित कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

- **सन २०१९ या आर्थिक वर्षात हाती घ्यावयाचे प्रकल्प राष्ट्रीय स्वच्छ हवा प्रकल्प :**

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने National Clean Air Programme या अंतर्गत हवा प्रदूषण नियंत्रित करण्याचे उपाययोजना कृती आराखडा तयार करण्याबाबत स्थानिक संस्थाना निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने पर्यावरण विभागातर्फे पुढीलप्रमाणे प्रकल्प प्रस्तावित केलेले आहेत.

- **अद्ययावत हवा प्रदूषण मोजणारी उपकरणे उभारणी करणे :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी हवा प्रदूषण मोजण्याची अद्ययावत उपकरणे बसविण्यात येणार आहे. सदर उपकरणे संगणक प्रणालीने जोडण्यात येतील व हवा प्रदूषणाची तसेच वातावरण

घटकांची Real Time data माहिती नागरीकांना मोबाईल ॲपद्वारे तसेच डिजीटल फलकाद्वारे दर्शविण्यात येणार आहेत. त्यासाठी **रु.४.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **डिजीटल डिसप्ले बोर्ड :**

ठाणे शहरातील हवेचे ६०% प्रदूषण मुख्यत्वे वाहनांमुळे होते. चौकांमध्ये शहरातील दैनंदिन हवेची गुणवत्ता नागरिकांना सहजतेने पाहता आल्यास नागरिक वाहनांद्वारे होणा-या प्रदूषणाबाबत जागरुक होतील. त्याकरीता ठाणे महानगरपालिकेद्वारे ठाणे शहरातील महत्वांच्या चौकांच्या ठिकाणी हवेच्या गुणवत्तेबाबत माहिती दर्शविणारे Display Board उभारण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **ध्वनी नियंत्रण योजना** :

ठाणे महानगरपालिकेने शासनाच्या आदेशानुसार २६ ठिकाणी शाळा, हॉस्पीटल आणि सिग्नल शाळा, नाका शाळा, प्लॅटफॉर्म शाळा या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर नीरी या तज्ञ संस्थेकडून शास्त्रीय दृष्टया अभ्यास करुन Noise Barrier उभारण्यात येणार आहेत..

- **खाडीच्या पाण्याचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी नाल्याच्या पाण्यावर प्रक्रिया करणे :**

ठामपातर्फे एकूण ८ ठिकाणी खाडी किनारी चौपाटी विकसित करण्याचा प्रकल्प सुरु आहे. सदर परिसरातील नाल्याचे प्रदूषित पाणी खाडीपात्रात मिसळते. यासाठी नाल्याचे पाण्याचे नैसर्गिक पध्दतीने शुध्दीकरण करण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला आहे. प्रायोगिक तत्वावर पारसिक चौपाटी येथील एक नाला व कोलशेत नाला या दोन नाल्यांवर प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **कांदळवनाचे संवर्धन :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कांदळवन कक्षाकडून नकाशे मागविले असून त्याबाबतची सद्यस्थिती माहिती देण्यासाठी टोटल स्टेशन सर्व्हे ड्रोन कॅमे-याने फोटो काढणे तज्ञ संस्थेकडून कांदळवन संवर्धनाचा कृती आराखडा तयार करणे इत्यादी कामे करण्यात येणार आहे.

- **पर्यावरण महोत्सव :**

ठामपा क्षेत्रातील नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयक जनजागृती व सहभाग वाढविण्यासाठी ठाणे क्रिडा महोत्सव या धर्तीवर पर्यावरण महोत्सव करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये महाविद्यालयांमध्ये स्पर्धा घेणे, रहिवासी संकुलामध्ये विविध स्पर्धा व उपक्रम राबविणे, लघुचित्रपट स्पर्धा राबविणे, ग्रीन बिझनेस ॲवार्ड देणे, पर्यावरण संवर्धनाच्याबाबी तसेच प्लास्टीक व थर्माकोल या वस्तूंना पर्यायी वस्तूंचे प्रदर्शन उभारणे इत्यादी सारख्या ठाणे महानगरपालिका राबवित असलेल्या विविध पर्यावरण पूरक धोरणाची माहिती देणे इत्यादी बाबी प्रस्तावित आहेत. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**शिक्षण विभाग**

ठाणे महानगरपालिकेत मोठया प्रमाणात विकासाची कामे हाती घेण्यात आली असुन काही पूर्ण झालेली आहेत. त्या सोबतच जी मुले शिक्षणापासून वंचित आहेत त्यांच्यासाठी सुध्दा मोठया प्रमाणात उपक्रम हाती घेण्यात आले आहे.

" घर से मस्जिद है बहुत दूर,<br>
चलो यूँ कर ले,<br>
किसी रोते हुए बच्चे को हँसाया जाये "

शिक्षण विभागाने शाळाबाहय मुलांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले असून राज्य शासन, केंद्र शासन व आंतरराष्ट्रीय स्तरावर याची नोंद घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने सिग्नल स्कुल, या संकल्पने अंतर्गत सिग्नल वर थांबणा-या विविध मुलांना शिक्षणाचे मुख्य प्रवाहात आणण्यात येत आहे. याच धर्तीवर मुंब्रा प्लॅटफॉर्म येथे प्लॅटफॉर्म स्कुल व कापूरबावडी येथे नाका शाळा असे उपक्रम राबविण्यात आले आहेत. कापूरबावडी मधील नाका शाळा येथे महारेरा मार्फत एमएमआर रिजन अंतर्गत बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

१) गायमुख जकात नाक्याचे रुपांतर शाळेमध्ये करणारी ही पहिलीच महापालिका आहे.

२) मुलांसाठी बालरंगकर्मी योजना राबविण्यांत येत असून याद्वारे मुलांच्या विविध कला गुणांना वाव मिळाला आहे.

## शैक्षणिक योजना

१) **विद्यार्थ्यासाठी :-** आर.के.लक्ष्मण कला क्रीडा, एकलव्य रात्रशाळा, पीपीपी तत्वावर कनिष्ठ महाविद्यालय , १० सेमी इंग्लिश स्कूल, दिव्यांगासाठी रिसोर्स सेंटर इत्यादी योजना राबविण्यात आल्या.

२) **शिक्षकांसाठी :-** Tech Mahindra तर्फे इंग्लिश स्पिकींग , Residential Training इत्यादी सारख्या योजना राबविण्यात आल्या. त्याचप्रमाणे विशेष बाब म्हणजे शिक्षकांची २४ वर्षे कालबध्द पदोन्नती मंजूर करण्यात आली. गेल्या १० वर्षापासून रिक्त असलेल्या मुख्याध्यापक संवर्गातील ५१ पदांवर पदोन्नतीव्दारे नियुक्ती करण्यात आली.

३) **शिकवणी कार्यपध्दती :-** यामध्ये Virtual Classroom, Activity Base Learning ,ज्ञानरचनावाद, आणि परिसर ज्ञान इत्यादी योजना राबविण्यात आल्या.

## बिगर शैक्षणिक योजना

१) मुलांसाठी बालरंगकर्मी योजना राबविण्यात आली असून याव्दारे मुलांच्या विविध कलागुणांना वाव मिळाला आहे.
२) माध्यमिक शाळांना मध्यान्ह भोजन.
३) डि.बी.टी. मार्फत प्रथमच क्रीडा गणवेष वाटप.
४) शाळा सुरक्षिततेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले.
५) शालेय विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना.
६) शैक्षणिक सहकार्य सेतू.
७) विज्ञान कोपरा.
८) सर्व शाळांना संगणक व प्रिंटर पुरवठा.
९) अक्षयपात्र योजनेव्दारे सुमारे १०,००० विद्यार्थ्यांना रुचकर व सकस भोजन.
१०) फेस रिडींग मशिन व्दारे शिक्षकांची दैनंदिन उपस्थिती नोंदविणे.
११) शाळा दुरुस्तीसाठी वाढीव तरतूद उपलब्ध.
१२)मुंब्रा गर्लस फूटबॉल लिग.

**शिक्षण सुविधा**

**"एक पुस्तक एक वही-दप्तराचे ओझे नाही"**

दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी सर्व विषयांचे मासिक नियोजन तयार करुन एका महिन्यासाठी सर्व विषयांच्या एकाच पुस्तकाची

निर्मिती केल्यास सर्व विषयांची पुस्तके व वहया आणण्याचे विद्यार्थ्यांचे परिश्रम वाचतील. तसेच मुलांना दर महिन्याला नविन पुस्तक आणण्याचा आनंद मिळेल, प्रत्येक महिन्याला नविन पुस्तक असल्याने वर्षाच्या शेवटी फाटलेली पुस्तके वापरण्याची वेळ येणार नाही व सर्व शाळांमध्ये अभ्यासक्रम शिकविण्यासाठी समानता राहील. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**व्यवहार ज्ञान गुरु :**

विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील व्यवहाराकरीता उदा. बँकखाते हाताळणे, वस्तूंची खरेदी करताना घ्यावयाची काळजी, खादयपदार्थ, औषधे खरेदी करताना घ्यावयाची काळजी इत्यादींबाबत तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**मला काही सांगायचे :**

शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीत विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग व्हावा यादृष्टीने विद्यार्थ्यांमार्फत शिक्षकांचे मूल्यमापन करण्यासाठी प्रत्येक शाळेत ॲक्रॅलीक पेटी ठेवून स्वयंसेवी संस्थेमार्फत विश्लेषण व उपाययोजना सुचविण्यात येणार आहे. त्यासाठी **रु.३० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

**शहर वैविध्यता दर्शन :**

शालेय विद्यार्थ्यांना शहरातील विविध कला व संस्कृतीची ओळख होणेसाठी ५ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना ठाणे परिवहन सेवेच्या सहकार्याने ठाणे दर्शन घडविण्यात येणार आहे. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**सामाजिक दीपस्तंभ शाळा :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्र हे एकही शाळाबाहय मूल नसलेले शहर बनविणे, दिव्यांग मूल मनपा योजनेपासून वंचित नसलेले शहर बनविणे, माध्यमिक शिक्षणापासून वंचित असलेले एकही मूल नसलेले शहर बनविणे व प्रत्येक शाळेने सभोवतालच्या परिसरामध्ये स्वच्छता दूत म्हणून काम करणेकरीता शाळेसभोवतालचा १०० मीटर परिसर दत्तक घेऊन सदर योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी **रु.२५ लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

**डिजीटल क्लासरुम :**

सन २०१९-२० मध्ये ४०० वर्गखोल्या डिजीटल करण्याचे प्रस्तवित असून त्यासाठी **रु.१५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**ई-संवाद :**

पालक-शिक्षकांमध्ये सुसंवाद सेतू निर्माण करणे, मुलांची दैनंदिन हजेरी पालकांना कळविणे, शैक्षणिक प्रगतीबाबत सुसंवाद साधणे, आपत्कालीन परिस्थितीबाबत पालकांना सूचीत करणेसाठी सदरची योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी **रु.१० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

**अक्षयपात्र योजना :**

ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा, मुंब्रा व दिवा या गटातील शालेय विद्यार्थ्यांसाठी रुचकर व सकस मध्यान्ह भोजन पुरविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी **रु.७ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**डिजीटल साक्षरता योजना :**

आदिवासी दुर्गम भागातील शालेय विद्यार्थ्यांना संगणक, लॅपटॉप विविध ॲपबाबत सेवा उपलब्ध करुन डिजीटल साक्षर करुन त्यांना सक्षम बनविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी **रु२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**क्रिडा सुविधा**

सन २०१८-१९ मध्ये नागरिक व खेळाडूंच्या शारीरिक व मानसिक विकासाकरीता पुढील प्रमाणे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

- दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृहामधील मैदानात राष्ट्रीय दर्जाची रु.३.५५ कोटी खर्चाची क्रिकेट खेळपट्टी व आऊट फिल्ड तयार करण्यात आली आहे.
- दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह येथे रात्रीच्या सामन्यांसाठी व सरावासाठी आधुनिक पध्दतीची विद्युत प्रकाश योजना व व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी चार सॅटीस टॉवर व छतावर आठ हेड फ्रेम बसवून एकूण ४६० ऊर्जा कार्यक्षम एलईडी फ्लड लाईट बसविण्यात येणार आहे. या कामासाठी रु. १४.२८ कोटी खर्च होणार आहे.
- याच क्रिडा प्रेक्षागृहात राष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट सामन्यांकरीता एल.ई.डी. डिजीटल स्कोअर बोर्ड बसविण्यात येणार आहे.
- कौसा- मुंब्रा येथील मैलाना अब्दुल कलाम आझाद स्टेडीयम

येथील फुटबॉल मैदानात FIFA संघटनेने मान्यता दिलेले आर्टिफिशीयल फूटबॉल टर्फ उभारण्यात येणार आहे. यासाठी रु.२.८८ कोटी खर्च मैदान विकास या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येणार आहे.

- राज्य क्रिडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महानगरपालिका क्षेत्रात कबड्डी खेळाचे व्यवसायिक संघ तयार करण्यात येणार आहे.
- राज्य क्रिडा विषयक बार्बीना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ठाणे महानगरपालिकेचा महिला कबड्डी संघ तयार करण्यात आला आहे. यामध्ये १३ महिला खेळाडू, १ प्रशिक्षक व १ संघ व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पुरुष कबड्डी संघाची मैदान निवड चाचणी घेण्यात येत असून पुरुष कबड्डी संघ तयार करणेची कार्यवाही सुरु आहे.

- शहिद हेमंत करकरे मिनी क्रिडा संकुल येथे महापालिकेचे अधिकारी, नगरसेवक व पदाधिकारी यांचेकरिता शहिद तुकाराम ओंबळे बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस कोर्ट इत्यादी व त्याकरिता आवश्यक सर्व सुविधांचे नुतनीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.

मैदान विकास अंतर्गत १० पैकी ६ मैदानांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ४ मैदानांची कामे प्रगतीपथावर आहेत.

या सर्व प्रकल्पांसाठी दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह नूतनीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.१२ कोटी** व मैदान विकास या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

- दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृहामधील मेदानाच्या संरक्षक कंम्पाऊंडच्या बाहेरुन ॲथलेटीक्स सरावाकरिता ४०० मीटरचा सिंथेटीक ट्रॅक तयार करण्यात येणार असून त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.
- बाळकूम तरणतलाव बांधकाम टप्पा क्रमांक १ चे काम पूर्ण करण्यात आले असून टप्पा क्रमांक २ चे काम मे २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

**आऊट डोअर फिटनेस साहित्य (ओपन जिम ईक्वीपमेंटस्) :**

महापालिका क्षेत्रातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्याकरीता ५४ सार्वजनिक ठिकाणी विविध प्रकारचे आऊट डोअर फिटनेस साहीत्य सन २०१७-१८ मध्ये बसविण्यात आले असून त्यासाठी रक्कम रु.३.४० कोटी एवढा खर्च करण्यात आला आहे. सन २०१९-२० साठी रु.१ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**क्रिडा संकुल विकास करणे :**

पोखरण रोड क्र.२ वरील बेथनी हॉस्पीटलच्या मागे महापालिकेचा ४८४० चौ.मी. क्षेत्रफळाचे सुविधा भूखंड आहे. तसेच त्यालगत रवि इस्टेट मागे २१४१५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड रिक्रीएशनल ग्राऊंडसाठी आरक्षित आहे. या परिसरातील शाळांना स्पर्धांकरीता मैदान अस्तित्वात नसल्याने खेळाचे मैदाने, बास्केट कोर्ट, लॉनटेनिस कोर्ट, सिनथेटीक ट्रॅक, जिन्मशिअम, पार्कींग इत्यादी सुविधांसह पीपीपी तत्वावर विकास करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच ॲमिनीटी ओपन स्पेसवर हेल्थ क्वेस्ट सह सर्व्हिस अपार्टमेंटस् करीता इमारत प्रस्तावित आहे.

**बोरीवडे खेळाचे मैदान :**

ठाणे महापालिका क्षेत्रातील बोरीवडे आरक्षण क्र.३ या ८४,८०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या मैदानात घोडबंदर परिसरातील शाळांच्या क्रिडा स्पर्धांकरीता इन डोअर व आऊट डोअर गेम तसेच निवासी व्यवस्था उपलब्ध करण्यात येणार आहे. याव्यतिरीक्त बँक्वेट हॉल, ॲडमिनीस्ट्रेटीव्ह बिल्डींग, कॉन्फरन्स हॉल, बिझनेस सेंटर, हेल्थ क्लब, एक्झीबीशन हॉल, रेस्टॉरन्ट आणि पार्कींग या सुविधांसह विकसीत करण्यात येणार आहे. या करिता स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यात आल्या असून आरएफपी बाबत कार्यवाही सुरु आहे.

**अग्निशमन सेवेचे बळकटीकरण**

- अग्निशमन विभागासाठी ८ नग क्विक रिस्पॉन्स व्हेईकल, ६ नग मोटर बाईक वॉटर मिस्ट सिस्टिमसह या आर्थिक वर्षात खरेदी करण्यात आले आहेत.
- ठाणे शहरातील उंच इमारतींच्या संख्येत सातत्याने होणारी वाढ पाहता, अग्निशमन विभागासाठी ९० मीटर उंच जाणारी शिडी हायड्रोलिक एरियल लॅडर प्लॅटफॉर्म व ६ नग हायराईज बिल्डिंग

फायर फायटिंग व्हेईकल खरेदीसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे. यासाठी वाहने खरेदी या लेखाशीर्षांतर्गत **रु.३० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- साधनसामुग्री अंतर्गत १ नग होज केअर मशीन व इतर साधनसामुग्री खरेदीसाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.
- High Rise Fire Fighting Vehicle :

साधन सामुग्री सहित प्रत्येक वाहनाची किंमत ही ३ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असून ज्या इमारतींचे क्षेत्रफळ हे १० लाख चौ. फूटापेक्षा जास्त असेल त्या प्रत्येक प्रोजेक्टला वरील प्रकारचे वाहन हे साधनसामुग्री सहित बंधनकारक करण्यात आले आहे व आजमितीस २५ वाहने ही फ्री ऑफ कॉस्ट (मोफत) विकासकाकडून प्रोजेक्टला O.C. देणेपूर्वी अग्निशमन दलास प्राप्त होणार असून महापालिकेचा रु.७५ कोटीपेक्षा जास्त निधी वाचणार आहे. शिवाय यापुढे सुध्दा जे जे नविन प्रोजेक्ट तयार होतील त्या प्रोजेक्टसाठी देखील अशी साधनसामुग्री व वाहने प्राप्त होणार आहेत. त्यासाठी महापालिकेचा निधी खर्च करण्याची आवश्यकता भासणार नाही. येत्या वर्षात विकासकाकडून ८ वाहने याप्रमाणे एकूण ३३ वाहने प्राप्त होणार आहेत. यामुळे महापालिकेची रु.९९ कोटी खर्चाची बचत होणार आहे.

**ठाणे आपत्ती प्रतिसाद दल**

आपत्कालीन परिस्थितीत प्रभावीपणे काम करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) च्या धर्तीवर ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाची निर्मिती करण्यात आली. सध्यस्थितीत या पथकामध्ये एक डेप्यटी कमांडर व १५ जवान कार्यरत आहेत. उर्वरित ३५ जवान राज्य अगिशमन सेवेच्या प्रशिक्षीत जवानांमधून तैनात करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच प्रत्येक जवानांचा प्रत्येकी रु.१५ लक्ष रुपयाचा विमा विमा संचलनालयाकडून उतरविण्यात आला आहे. तर न्यू इंडिया एश्योरंस कं.लि. च्या माध्यमातून मेडिकल पॉलिसी, समूह अपघात विमा काढण्यात येणार आहे.

ठाणे आपत्ती बचाव पथक जास्त सक्षम करण्यासाठी विविध साधनसामुग्री खरेदीकरीता सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात **रु.५ कोटी** व वाहने खरेदी करीता **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**कार्यशाळा**

- ठाणे शहरात वैदयकीय सेवा तातडीने पुरविण्याकरीता ३० नग मोटर बाईक ॲब्युलन्स पैकी १५ नग मोटर बाईक ॲब्युलन्स दाखल झाल्या आहेत.

- ठाणे शहरातील मलवाहिन्यांचे चोकअप काढण्याचे काम अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कमीत कमी वेळेत व पाण्याची बचत करणेकरीता वापरलेले पाणी रिसायक्लींग करण्याकरीता अत्याधुनिक यंत्रणा असलेले सहा नग हायप्रेशर सक्शन कम जेटींग युनिट विथ रिसायक्लर फॅसिलिटी वाहन खरेदी करण्यात आले आहे. त्यापैकी ४ नग २५ टन वाहनाची प्रती नग किंमत रु.५.५७ कोटी व २ नग १६ टन वाहनाची प्रती नग किंमत रु.४.३७ कोटी आहे. सन २०१९-२० व २०-२१ या आर्थिक वर्षात १६ टनाची ४ नग वाहने खरेदी करण्यात येणार असून प्रती नग वाहनाची किंमत रु ४.७५ कोटी आहे. यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी रु. १२ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**महिला बालकल्याण योजना**

- महिला बालकल्याण योजनेमार्फत सन २०१६-१७ मध्ये १०४७५ लाभार्थ्यांना विविध योजनांमध्ये लाभ देण्यात आलेला आहे. सन २०१७-१८ मध्ये २०४०४ व सन २०१८-१९ मध्ये २८६६३ लाभार्थ्यांना विविध योजनांद्वारे लाभ दिला आहे.

- ठाणे महापालिकेच्या शाळांमध्ये १२७ ठिकाणी, सार्वजनिक शौचालयांमध्ये १६२ ठिकाणी सॅनीटरी नॅपकीन वेडींग मशीन बसविण्यात आले.

- महिलांना स्वयंसहाय्यता बचत गटांना व्यवसायभिमुख होण्यासाठी विविध मशीन घेण्यासाठी थेट अनुदान देण्यात आले. यामध्ये पर्यावरणाभिमुख ठाणे करिता कापडी पिशव्यांची निर्मिती करण्याचा प्रकल्प महिला स्वय: सहाय्यता बचत गटामार्फत राबविण्यात येत आहे.

- सन २०१९-२० मध्ये महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या योजनांचे तपशीलवार पुस्तिका सोबत देण्यात येत आहे. त्यातील काही नाविन्यपूर्ण योजनेचा उल्लेख मी याठिकाणी करु इच्छितो.

- **लाडकी लेक दत्तक योजना :** सदर योजनेसाठी मुलगी दत्तक घेणा-या कुटुंबाला प्रती लाभार्थी रु.५० हजार अनुदान देण्यात येणार असून सदर निधीतून पालन पोषण व शिक्षणासाठी व तिच्या उज्वल भविष्यासाठी मदत होणार आहे.

- **राजकन्या योजना :** मुलगी जन्माला आल्यावर तिच्या सर्वांगीण विकासासाठी, मुलीच्या जन्मदारात वाढ करणे, स्त्रीभ्रूण हत्या रोखणे व मुलीचे पोषण व शिक्षणाच्या मदतीसाठी अर्थसहाय्य म्हणून रु. २०,००० एका कुटुंबातील २ मुलींना देण्यात येणार आहे.

- **६० वर्षे व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या विधवा, घटस्फोटीत महिलांच्या उदरनिर्वाहासाठी अनुदान देणे :** ठाणे शहरातील विधवा, घटस्फोटीत व निराधार महिलांच्या उदरनिर्वाहासाठी प्रती लाभार्थी रु.१८ हजार अनुदान देण्यात येणार आहे.

- **नाका कामगारांच्या १८ वर्षाआतील मुले व मुलींसाठी शिक्षणाकरीता अर्थसहाय्य :** या योजनेत नाका कामगारांच्या १८ वर्षाआतील मुले व मुलींसाठी प्रती लाभार्थी रु. २० हजार प्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे.

- **UPSC/MPSC/पोलिस / बँकींग इत्यादी सारख्या स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-या मुलींना अर्थसहाय्य** : या स्पर्धा परिक्षेची तयारी करणा-या मुलींना वार्षिक रु. २० हजार शुल्कासाठी अर्थसहाय्य करुन मुलींना प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

- १२ वी नंतरचे वैदयकीय, अभियांत्रिकी, संगणक, एम.बी.ए., कायदा, समाज कार्य यासारखे व्यावसायिक व उच्च शिक्षण (पूर्ण वेळ) घेत असलेल्या गुणवत्ता प्राप्त मुलींना रु.२० हजार अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. त्यामुळे मुलींना व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्रोत्साहन व मदत मिळणार आहे.

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुली / महिला खेळाडूंकरीता रु.२० हजार अर्थसहाय्य करुन महिलांचे क्रीडा क्षेत्रात स्थान निर्माण करण्यासाठी खेळाडूंना अनुदान देण्यात येणार आहे.

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील दुर्धर आजाराने ग्रासलेल्या महिलांच्या जीवनास नवसंजीवनी मिळणार असून प्रती लाभार्थी रु. ५० हजार अनुदान देवून उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य करण्यात येणार आहे.
- महिला उद्योजक यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्रीसाठी तरतूद करण्यात आली आहे.
- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नोंदणीकृत महिला बचत गटाच्या माध्यमातून कापडी पिशव्यांची निर्मिती करुन वितरीत करणे.
- या शिवाय तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देवून महिलांचा सर्वांगीण विकास करणे, प्रभाग समितीस्तरावर समुपदेशन केंद्र / विधी सल्लागार केंद्र चालविणे, यासारखे उपक्रम राबविण्याचा महापालिकेचा मानस आहे.

- ठाणे महानगरपालिका शाळेतील मुलींना उपस्थिती भत्ता, पाळणाघर व बालवाडया त्यांना सक्षम करणेसाठी कुपोषण मुक्त बालकांच्या विकासासाठी अत्यावश्यक सुविधा निर्माण करणे व बेघरांसाठी रात्र निवारा केंद्र इत्यादीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करण्याचा मानस आहे. यासाठी महिला व बालकल्याण कार्यक्रमांतर्गत रु.२५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**कॉकलिअर इम्प्लांट प्रोग्राम**

मूकबधीर बालकांवर प्राथमिक अवस्थेतच कॉकलिअर इम्प्लांट ही शस्त्रकिया केल्यास कर्णबधीर आजारावर मात करता येऊ शकते व त्याला ऐकू येण्याबरोबर बोलताही येवू शकते. याकरीता ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज व इतर रुग्णालयांमध्ये डॉ. उप्पल हॉस्पीटल ठाणे महापालिकेच्या विद्यमाने अशी योजना राबविणेत येत आहे. व या शस्त्रक्रियेसाठी अंदाजे रु.७ लक्ष खर्च येत असून या खर्चातील **रु.२.५० लक्ष** खर्च ठाणे महापालिका करीत आहे.

ऑक्टोबर २०१६ पासून आतापर्यंत एकूण ४५ बालकांच्या शस्त्रक्रियेसाठी ठाणे महापालिकेने **रु.१.३६ कोटी** खर्च केलेला आहे. कॉकलिअर शस्त्रक्रिया झाल्यानंतर स्पीच थेरपी व त्याअनुषंगीक इतर उपचारासाठी बालकांना प्रतीवर्षी **रु.२० हजार** आर्थिक मदत देण्याचे प्रस्तावित आहे. कर्णबधीर मुलांची माहिती प्राथमिक स्तरावर होण्यासाठी भविष्यात नवजात शिशुंची कर्णबधीर चाचणी करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजना** | • दिव्यांग विभागामध्ये विविध योजनांद्धारे सन २०१६-१७ मध्ये ३०३२ लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. सन २०१७-१८ मध्ये ३७५० व सन २०१८-१९ मध्ये ६३५७ लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. |

- दिव्यांग बेरोजगारांना उदरनिर्वाहासाठी रु.९०००/- प्रमाणे ४५४ लोकांना निर्वाह भत्ता देण्यात आला आहे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आवश्यक तंत्रज्ञान जसे की ब्रेल लिपी संगणकावर उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच त्यांचेसाठी ग्रंथालय व अभ्यासिका सुरु करण्यात आलेली आहे.

**सन २०१९-२० मधील काही नावीन्यपूर्ण योजना पुढीलप्रमाणे**

- ज्याप्रमाणे लहान मूकबधीर मुलांच्या कॉकलिअर इम्प्लांट शस्त्रकियेकरीता येणा-या खर्चातील महापालिका रु.२.५० लक्ष आर्थिक मदत करीत आहे. त्याच धर्तीवर छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये येणा-या कर्णबधीर व्यक्तींकरीता शस्त्रक्रिया करणे शक्य असल्यास त्यांना देखील **रु.२.५० लक्ष** आर्थिक मदत सन २०१९-२० पासून देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.
- दिव्यांगांना आवश्यकतेनुसार महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयात, नाटयगृह, दवाखाने, शाळा, शासकीय कार्यालय, परिवहन बस व काही बस डेपोमध्ये त्यांच्या मागणीप्रमाणे व्हिलचेअर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.
- दिव्यांग व्यक्तींच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी दिव्यांग व्यक्तींच्या विशेष स्पर्धा, क्रीडा, चित्रकला व हस्तकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.
- दिव्यांग व्यक्तींच्या अंगभूत कला गुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.
- दिव्यांग व्यक्तींमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण व्हावा तसेच त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध झाल्यास त्यांच्यामध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण होण्याबरोबरच आत्मविश्वास निर्माण होईल.

- दिव्यांग व्यक्तींना ई स्कूटर (इलेक्ट्रॉनिक विथ अडप्शनासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. ई स्कुटरमुळे प्रदुषण रोखणे व कमीत कमी खर्चात सुखकर होण्यास मदत होणार आहे.

- दिव्यांगांसाठी थेरपी सेंटरची निर्मिती करण्यात येणार आहे. तसेच त्यांना सेन्सर स्टिक, डिजिटल श्रवणयंत्र यासारखे अत्याधुनिक साहित्य पुरविण्यात येणार आहे.

- दिव्यांगांच्या कल्याणकारी योजनांसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात **रु. २२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**प्रशासकीय कामकाजात सुधारणा**

- सन २०१५ ते जानेवारी २०१९ पर्यंत एकूण ७९१ कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आली तर ३०१५ कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आले. ६९८ कर्मचा-यांची सरळसेवेने, ११७ कर्मचा-यांची अनुकंपा तत्वावर तर ३३० कर्मचा-यांची वारसा हक्काने नियुक्ती करण्यात आली.

- ठाणे महानगरपालिकेतील वर्ग १ ते वर्ग ४ मधील सर्व कर्मचा-यांच्या वार्षिक वैद्यकीय चाचणीसाठी प्रती कर्मचारी वार्षिक रु.३,५०० इतकी रक्कम अदा करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी अंदाजपत्रकात **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- महाराष्ट्र कामगार कल्याण अधिनियमातंर्गत वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी व कर्मचा-यांच्या कुटुंबासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याचे प्रस्तावित असून कामगार कल्याण निधी या लेखाशिर्षांतर्गत **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| **स्मार्ट सिटी प्रकल्प** | स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत आतापर्यंत केंद्र शासनाकडून रु.१९० कोटी व राज्य शासनाकडून रु.९३ कोटी असे एकूण रु.२८३ कोटी प्राप्त झाले असून महापालिकेने स्वत:चा हिस्सा म्हणून आतापर्यंत रु.१५० कोटी वर्ग केले आहे. सन २०१९-२० साठी महापालिका हिस्स्यापोटी रु.५० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. |

- **ठाणे व मुलुंड मनोरुग्णालयाजवळील प्रस्तावित नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक :**

ठाणे रेल्वे स्टेशन मधून दररोज ६.५० लक्ष प्रवासी प्रवास करतात. ठाणे स्टेशनवरील हा प्रचंड भार कमी करण्याच्या दृष्टीने ठाणे व मुलूंड स्टेशन दरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक प्रस्तावित केलेले आहे. सदरचा प्रकल्प मेंटल हॉस्पिटल जवळील १४.८३ एकर जमिनीवर असून हा प्रकल्प ठाणे महानगरपालिका व मध्यरेल्वेच्या संयुक्त विद्यमाने साकारण्यात येणार आहे. ऑपरेटिंग (परिचलन) या अंतर्गत क्षेत्रातील काम मध्ये रेल्वे तर सर्क्युलेटिंग क्षेत्राचे काम ठाणे महानगरपालिका करणार आहे. या प्रकल्पाचा खर्च रु.२८९ कोटी आहे.

- **ठाणे स्टेशन पूर्वेकडील बाजूस मल्टी मोडल ट्रान्झीट हब व स्टेशन परिसर वाहतूक सुधारणा प्रकल्प :**

ठाणे स्टेशन पूर्व येथील वाहतूकीची कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. या प्रकल्पातंर्गत पुर्वद्रुतगती मार्गावरील अप रॅम्प पासून ठाणे पूर्व स्थानकापर्यंत १२ मी.रुंदीचे उन्नत मार्ग बांधण्यात येणार आहे व त्यापुढे बस टर्मिनस पर्यंत ८.५० मीटर रुंदीचा उन्नत मार्ग बांधण्यात येईल.

तसेच वाहनांच्या पार्किंगसाठी तळघर, रिक्षा प्रवासी व प्रवासी वाहनांकरीता स्वतंत्र मार्गीका, बस थांबे, ऐलिवेडेट डेक, यांचा समावेश आहे. या **प्रकल्पाचा खर्च रु.**२६७ कोटी आहे.

- **सॉफ्ट मोबिलीटी :** सदर प्रकल्पांतर्गत ठाणे स्टेशन परिसरातील १२.८७१ कि.मी. लांबीचे रस्ते घेण्यात आले आहे. या प्रकल्पामध्ये पदपथाची सुधारणा, साईनेज, लेनिंग, झेब्रा क्रॉसिंग, सायकल ,बस स्टॉप या कामांचा समावेश आहे. यामुळे पादचा-यांच्या सुरळीत व सुरक्षित दळणवळणासाठी मदत होईल. **याचा प्रकल्प खर्च रु.**२३ कोटी आहे.

या व्यतिरिक्त महापालिका निधीतून ५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांवर ५ कि.मी. लांबीचे सॉफ्ट मोबिलिटी नेटवर्क तयार करण्यात येणार आहे.

- **मासुंदा लेकफ्रंट डेव्हलपमेंट :**

मासुंदा तलावाचे रंगो बापुजी गुप्ते चौक ते गडकरी रंगायतन पर्यंतचा परिसराचे नुतनीकरण व सुशोभीकरण तसेच ग्लास कॅंटीलिव्हर फूटपाथचे काम करण्यात येत आहे. यासाठी रु.१२ कोटी खर्च करण्यात येणार आहे. एकात्मिक विकासाच्या दृष्टिकोनातून सदर तलावाची उर्वरित कामे ठाणे महापालिका निधी व खासदार निधीमधून करण्यात येत आहेत.

- **गावदेवी मैदान येथे भूमीगत पार्कींग व्यवस्थापन** :

ठाणे महानगरपालिका हद्दीतील ठाणे पश्चिम स्टेशन परिसरात मोठया प्रमाणात वाहनांची ये जा असते आणि या भागात पार्कींगच्या सुविधेचा विचार करता गावदेवी मैदान येथे भूमीगत तळघर पार्कींग व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. यामध्ये ४२२२ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम होणार असून यामध्ये १३० चारचाकी व १२० दुचाकी वाहनांच्या पार्कींगची सुविधा निर्माण होईल. यासाठी रु.२७ कोटी खर्च अपेक्षित आहे.

- **आयटीएस उन्नत वाहतूक प्रणाली :**

हा प्रकल्प ठाणे महानगरपालिका आणि ठाणे परिवहन सेवां द्वारे सुरु करण्यात आला आहे. यामुळे प्रवाशांना बसेस, त्यांचे वेळापत्रक आणि विविध घडामोडींबद्दल माहिती मिळेल. या प्रकल्पाचा खर्च रु.४ कोटी आहे.

- **१२ अर्बन रेस्ट रुम :**

क्षेत्राधारित विकासांतर्गत एकूण १२ ठिकाणी शहरी विश्रामगृहाचे काम सुरु आहे. सदर प्रकल्पाचा खर्च रु.५ कोटी आहे.

- **ऑनलाईन कार्यक्षमता परिक्षण (एसएलबी) :**

या प्रकल्पामुळे पाणी पुरवठा,मलनि:सारण, नाला व घनकचरा व्यवस्थापन या सेवेच्या पातळीवर लक्ष ठेवण्यासाठी व समस्यांचे नियोजन करण्यास मदत होईल. या प्रकल्पाचा खर्च रु. ८ कोटी आहे.

- **नाले बांधकाम** :

या अंतर्गत ४.४५ कि.मी लांबीचे रु.४९ कोटी रकमेची नाल्यांची कामे हाती घेण्यात आलेली असून सदरची कामे मे २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाचा खर्च रु.४९ कोटी आहे.

- **मलवाहिन्या टाकणे :**

ठाणे शहरातील स्मार्ट सिटी ABD क्षेत्रातील भुयारी गटार योजनेमध्ये सर्वसमावेशक सुधारणा करणे या कामांतर्गत ३७ कि.मी. ची मलवाहिनी टाकणे प्रस्तावित असून सुमारे २००० हाऊस कनेक्शन जोडण्यात येणार आहे. यासाठी रु.२५ कोटी खर्च अपेक्षित आहे.

- **पाणी वितरण व्यवस्था :**

ABD भागातील वितरण व्यवस्था रिमॉडेलिंगचा प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत किसननगर, पडवळनगर, रघुनाथनगर, मेंटल हॉस्पिटल, रहेजा कॉम्प्लेक्स, कोपरी इत्यादी भागासाठी २ जलकुंभ (क्षमता ५.५ एम.एल.) व ६८ कि.मी. लांबीच्या वितरण व्यवस्था अंथरण्यात येणार आहेत. यामुळे वितरण व्यवस्थेचे सक्षमीकरण होईल. या प्रकल्पाचा खर्च रु.३५ कोटी आहे.

- **स्मार्ट वॉटर मिटर :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना फ्लॅट रेटने (ठोक दराने) पाणी पुरवठा करते. शासनाच्या धोरणानुसार नागरिकांच्या नळ संयोजनावर पाण्याचे जलमापके (स्मार्ट मीटर) बसवून प्रत्यक्ष पाण्याच्या वापरानुसार पाण्याचे देयक देणे आवश्यक असल्याने ठाणे महानगरपालिका हद्दीतील व्यावसायिक व घरगुती अशा सर्व प्रकारच्या संयोजनावर जलमापके बसवून त्याप्रमाणे पाण्याची बिले देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. यामध्ये एकूण १,१३,००० नळ संयोजनावर एएमआर (ॲटोमेटेड रिडिंग फॅसिलिटी) जलमापके बसविण्यात येणार आहे. प्रथम टप्प्यात सर्व प्रकारची व्यावसायिक जलसंयोजने व मोठया आकाराची इमारतीमधील घरगुती संयोजने यावर स्मार्ट मिटर बसविण्यात येणार आहेत. दुस-या टप्प्यामध्ये झोपडपट्टी भागामध्ये स्मार्ट मिटर बसविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा एकूण खर्च रु.१२१.०३ कोटी एवढा असून स्मार्ट सिटी अंतर्गत रु. ९३.१९ कोटी व परिचलन व व्यवस्थापनाकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत रु.२७.८४ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

- **तीन हात नाका येथे ग्रेड सेपरेटर :**

पुर्व द्रुतगती महामार्गावर तीन हात नाका या जंक्शनवर वाहतूकीची कोंडी होत असल्याने त्यावर कायम स्वरुपी उपाय योजना करण्यासाठी तीन हात नाका येथे अस्तित्वातील उड्डाण पुलाखाली लाल बहादूर शास्त्री रस्त्यावर मुलूंड - वागळे इस्टेट ते हरीनिवास कडे जाणा-या मार्गावर दोन्ही दिशांना जाण्यासाठी ७५० मी लांबीचा चौपदरी भुयारी

मार्ग व लगतच्या रस्त्याचे रुंदीकरण प्रस्तावित आहे.या **प्रकल्पाचा खर्च रु.२३९** कोटी आहे.

- **महापालिकेच्या इमारतींवर सोलार पॅनल बसविणे (१० MW सोलार रुफिंग :-**

ठाणे महापालिकेच्या कार्यालयीन इमारती तसेच इस्पितळे, यांच्या छतावर सोलार पॅनल उभारुन १० MW सौर ऊर्जा नर्मिती करण्यात येणार आहे. **प्रकल्प खर्च रु.७०** कोटी उत्पन्न स्त्रोत "(पीपीपी) खाजगी लोकसहभाग"

- **७० एकर समूह विकास योजना (Cluster Development)**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी शासनाने समूह विकास योजनेस दिलेल्या मान्यतेनुसार एकूण ४४ परिसराचे नागरी पुनरुथ्थान आराखडयाचे नियोजन १५०८.९३ हेक्टर इतक्या क्षेत्रावर अंतिम करण्यात आले आहे. त्यापैकी क्लस्टर योजना राबविणे कामी महानगरपालिकेने ६ परिसरांची प्राधान्याने निवड केलेली असून, त्यामध्ये कोपरी, हाजुरी, टेकडी बंगला, लोकमान्यनगर, किसननगर आणि राबोडी परिसराचा समावेश आहे. या ६ आराखडयांना उच्चाधिकार समितीने मंजूरी दिली असून, सद्यस्थितीत या ठिकाणच्या क्लस्टर योजना अंमलबजावणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत किसननगर येथे ७० एकर भागाचा समावेश आहे.

**प्रकल्प खर्च रु.३९७४** कोटी असून पीपीपी व खाजगी लोकसहभागातून करण्यात येणार आहे.

- **डिजी ठाणे :-**

डिजी ठाणे हा महापालिकेचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. ठाणे शहरातील नागरिकांसाठी हा एक डिजीटल प्लॅटफॉर्म आहे याद्वारे युजर्सला ठाणे शहरात होत असणा-या विविध घडामोडी आणि विविध सेवांची माहिती मिळते आहे. त्यासाठी डिजीकार्ड मोबाईल ॲप आणि संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे. सद्यस्थितीत ७५,००० नागरिकांनी या ॲपवर नोंदणी केली आहे. **प्रकल्प खर्च रु.२८** कोटी आहे.

- **एंटरप्राईज रिसोर्स प्लानिंग:-**

ठाणे महानगरपालिकेच्या सेवा ऑनलाईन होण्याकरीता आणि त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी एंटरप्राईज रिसोर्स प्लानिंग हि संगणक आधारीत प्रणाली सुरु करण्यात येणार आहे. तसेच शहरात

सुरु असणा-या सीसीटीव्ही आणि वायफाय प्रकल्प हया डेटा सेंटरशी जोडण्यात येईल.या प्रकल्पाचा **खर्च रु.१२** कोटी आहे.

- **२६७ kw स्कूल सोलार रुफटॉप**

क्षेत्राधारित विकासामध्ये २६७ किलो वॅट ग्रीड कनेक्टड सोलार सिस्टिम ऊर्जा प्रकल्पांची उभारणी ५६ महापालिका शाळांवर करण्यात येत आहे. यामध्ये सोलार पॅनल प्रत्येक शाळेच्या छतावर बसविण्यात येतील. हा प्रकल्प कार्बन उत्सर्जन कमी करणारा असून पर्यावरण पुरक आहे. या प्रकल्पाचा खर्च **रु.२.२५** कोटी आहे.

- **घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प**

क्षेत्राधारित विकासअंतर्गत घनकच-याचे वर्गीकरण करुन कचरा निर्मितीच्याच ठिकाणी कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येकी १० टन क्षमतेच्या वेगवेगळ्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी १० घनकचरा व्यवस्थापन संयंत्रणा बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पाचा खर्च **रु.२१** कोटी आहे.

- **वॉटर फ्रन्ट डेव्हलपमेंट :-**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ३२ कि.मी. लांबीचा खाडी किनारा असल्याने सदर खाडीचे जतन, संवर्धन, स्वच्छता, वॉटर स्पोर्टस्, टूरिझम सेंटर्स, कन्व्हेन्शन सेंटर्स, जॉगींग ट्रॅक, प्रॉमिनेड अशा स्वरुपाच्या बाबींचा विकास करणेसाठी १३ झोनमध्ये वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट मास्टर प्लॅन बेल्जियमस्थित मे.ने.पौलीसन वास्तू विशारदाकडून तयार करण्यात आला आहे.

सदर प्रकल्पामुळे मनोरंजनात्मक सुविधा उपलब्ध, पर्यटनास चालना, निर्सगसौदर्यांत भर, खाडी किनाऱ्याचे संरक्षण- संवर्धन व सुशोभिकरण, पर्यावरणाचे संतूलन राखण्यास मदत, रोजगार निर्मीती, परिसरातील आर्थिक स्तरांत वाढ होणार आहे.

सदर मास्टर प्लॅन मधील ८ भागांमध्ये वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट ची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत. यापैकी ठाणे स्मार्ट सिटी लि. अंतर्गत पारसिक रेतीबंदर चौपाटी, नागलाबंदर, साकेत -बाळकूम, कळवा-शास्त्रीनगर, कोपरी या ठिकाणी खाडी किनारा-चौपाटी विकसित करण्याचे व सुशोभिकरणाचे काम प्रत्यक्ष सुरु आहे. एकूण ९.६५ कि.मी. लांबीच्या वॉटरफ्रंट डेव्हलपमेंटची कामे माहे डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाचा खर्च **रु.२२१.५०** कोटी आहे.

**इंटिग्रेटेड डेटा सेंटर व कमांड कंट्रोल रुम :-**

महापालिका नागरिकांना देत असलेल्या विविध सेवांचे एकात्मिक संचलन व व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने आवश्यक ती माहिती एकत्रित करुन तिच्यावर प्रक्रिया करणे व आवश्यक ते निर्णय घेऊन त्वरीत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी हाजुरी येथे इंटिग्रेटेड डेटा सेंटर व कमांड कंट्रोल सेंटर ची उभारणी करण्यात येत असून या प्रकल्पातंर्गत संपूर्ण शहरभर लावलेल्या कॅमे-यांचे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संनियंत्रण करण्यासाठी पोलिसांचे ठाणे शहरातील कमांड आणि कंट्रोल रुम पण अद्ययावत करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा खर्च **रु.४६.४६**कोटी आहे.

**इतर प्रकल्प**

- **स्मार्ट वॉटर मॅनेजमेंट :**

ठाणे महानगरपालिकेमार्फत स्काडा यंत्रणेद्वारे जलकुंभापर्यंतच्या पाण्याचे मोजमाप होणार आहे. तसेच ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड अंतर्गत स्मार्ट वॉटर मीटर बसविल्यामुळे ग्राहकास प्रत्यक्ष मिळणा-या पाण्याचे मोजमाप होईल. स्मार्ट वॉटर मॅनेजमेंटमध्ये पाणी पुरवठा यंत्रणेच्या उपांगांचे जी.आय.एस. मॅपींग करणे, ऑफलाईन आणि ऑनलाईन हायड्रॉलिक मॉडलिंग करणे तसेच अस्तित्वातील पाणी पुरवठयाच्या उपांगांचे तसेच स्मार्ट मीटर व स्काडाव्दारे उपलब्ध होणाऱ्या माहितीचे ॲनालिसिस करुन परिणामकारक पाणी पुरवठयाचे नियंत्रण करण्यात येणार आहे. सन २०१९-२० चे अर्थसंकल्पात **रु.५ कोटी** एवढी तरतूद करण्यात आली आहे.

**सॅटलाईट इमेज मॅनेजमेंट**

- **ॲटोमेटीक चेंज डिटेक्शन ॲण्ड मॉनिटरींग सिस्टिम :**

ठाणे महानगरपालिकेचे क्षेत्रफळ १२८ चौ.कि.मी. असून या क्षेत्रफळामध्ये विविध जमिन वापर अनुज्ञेय आहे. महानगरपालिकेचा विकास होत असतांना प्रत्येक दिवशी विविध भागात बदल होत असतात. यामध्ये विकास कामांमुळे होणारे चांगले बदल तसेच अनधिकृत बांधकामे, खाडी किना-याचे विद्रुपीकरण, पर्यावरणातील बदल या वाईट बदलांचा सुद्धा समावेश असतो. सदर बदलांचे विश्लेषण करुन त्याप्रमाणे आवश्यक उपाय योजना करणेबाबतची गरज लक्षात घेवून सदरहू प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. या प्रकल्पांमध्ये

ठाणे महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रफळाचे उपग्रहांच्या माध्यमातून प्रत्येक तीन महिन्यांनी मॅपिंग करण्यात येईल. प्राप्त झालेल्या इमेजेसच्या अनुषंगाने बदलांचे विश्लेषण करण्यात येईल व त्याबाबतचा अहवालाच्या आधारे महानगरपालिकेस बदलांचा विचार आवश्यक कार्यवाही करता येईल. या प्रकल्पाचा फायदा अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण, पर्यावरण बाबींवर नियंत्रण व विकास कामांचे मॅपिंग तसेच कर विभागास आवश्यक माहिती प्राप्त झाल्याने योग्य कर आकारणी होईल. यासाठी सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात **रु.३ कोटी** तरतूद ठेवण्यात आली आहे.

- **रोड ॲसेट मॅनेजमेंट** :

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण ३६७ कि.मी. लांबीचे रस्त्याचे जाळे आहे. यामध्ये सिमेंट काँक्रीट, डांबरी, युटीडब्ल्यूटी रस्त्यांचा समावेश आहे. सदरहू रस्त्याच्या वर्गवारी प्रमाणे प्रत्येक रस्तानिहाय ॲसेट मॅनेजमेंट करण्याचा प्रस्ताव आहे. यामध्ये लिडार सर्वेक्षणाद्वारे रस्त्याचे नकाशे अद्ययावत करणे, रस्ते निहाय फूटपाथ, कल्व्हर्ट, साईनबोर्ड, झेब्रा क्रॉसिंग, चौक इत्यादीचे मार्कींग नकाशावर करण्याचा समावेश आहे. तसेच रस्तेनिहाय रस्त्यांची स्थिती, रस्त्याच्या पृष्ठभागाची माहिती, रस्त्याखालील युटिलिटी मॅपिंग इत्यादीची माहिती संकलित करण्यात येणार आहे. ही आवश्यक माहिती योग्य प्रकारे मिळाल्याने चांगल्या प्रकारे रस्ते दुरुस्ती व नवीन रस्ते तयार करण्यास मदत होणार आहे. यासाठी **रु. २ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**विशेष प्रकल्प**

समाजातील प्रत्येक माणसाच्या चेह-यावर आनंद पसरविण्यासाठी महापालिकेने सन २०१८-१९ पासून विशेष प्रकल्पाअंतर्गत (Happiness Index) सामाजिक योजना राबविण्यासाठी तरतूदी केल्या आहेत.

यातील काही योजना कार्यान्वित होऊ शकत्या नाहीत. तथापि, काही योजनांच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. सन २०१९-२० मध्ये देखील यावर्षीच्या काही योजनांसह महत्वाचे उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. या योजना पुढील प्रमाणे आहेत.

- **ग्रीन कॅनॉपी**

घोडबंदर आणि पोखरण रोडच्या बाजूला असलेल्या फूटपाथवर हिरवळ निर्माण करुन सुशोभिकरण करणे, जेणे करुन फूटपाथ वरुन उन्हात चालणा-या पादचा-यांना सावली भेटेल व फूटपाथ वरुन

चालणा-या नागरिकांची संख्या वाढेल. या प्रकल्पामुळे ठाणे शहराची सुंदरता वाढेल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **व्हर्टीकल गार्डन**

ठाणे शहरात मोक्याच्या व गर्दीच्या २० ते २५ ठिकाणी उभे गार्डन असणारे बोर्ड उभे करणे. यामुळे तिथली हवा खेळती राहील. सदर बोर्डस् ठाणे महापालिकेच्या वाय-फाय सुविधेसोबत जोडून पर्यावरण अधिक डीजीटल असा उपक्रम करता येईल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **उद्यान दत्तक योजना**

ठाणे शहरात असणा-या विविध उद्यानांमध्ये छोटे प्लॉटस् ऑरगॅनीक शेतीसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच त्यासाठी लागणारे ज्ञान देण्यासाठी एका तज्ञ संस्थेला नियुक्त करण्यात येईल. याद्वारे नागरिक आणि महापालिका यांच्या समन्वय निर्माण होईल. तसेच उद्यानांची योग्य अशी निगा राखली जाईल. त्यासाठी **रु.१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **विद्यार्थी वृक्ष दत्तक उपक्रम**

ठाणे शहरातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांना वृक्ष दत्तक तत्वावर देण्यात येऊन विद्यार्थ्यांमार्फत वृक्षरोपण करुन त्याची योग्य निगा देखभाल करण्यात येईल.याकरीता शाळा व नियुक्त वृक्ष नर्सरी यांचेमार्फत मदत करण्यात येणार असून विद्यार्थ्यांमध्ये वृक्ष आणि पर्यावरण जागरुकता वाढवली जाईल. त्यासाठी रु.१ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

- **मिस्ट स्प्रे**

हवेच्या गणुवत्तेवर परिणामकारक मुख्य घटक हा प्रामुख्याने धूलीकरण आहे. रहदारीच्या चौकांच्या ठिकाणी धूळ प्रदूषण नियंत्रणाकरीता Mist Spray ही अद्ययावत यंत्रणा उभारणेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून पाण्याचे अतिसूक्ष्म थेंबांची फवारणी करुन हवेतील धूलीकरण नियंत्रित करण्यात येतात. ही यंत्रणा चौकांच्या ठिकाणी अतिशय कमी जागेत व रहदारीला अडथळा होऊ न होता उभारता येणे शक्य आहे. सदर Mist Spray ची उभारणी तीन हात नाका, कॅडबरी जंक्शन, माजिवडा, कापूरबावडी, बाघबीळ या चौकांमध्ये करण्यात येणार आहे. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **मुलांसाठी कला उपक्रम**

या उपक्रमाकरीता कला क्षेत्रात असणा-या संस्थेची नियुक्ती करुन ६ ते १२ महिन्यांचे कार्यक्रम आखून ठाणे शहरातील असणा-या झोपडपट्टी क्षेत्रातील मुलांसाठी संगीत, चित्रकला, डान्स तसेच विविध कलांचे शिक्षण दिले जाईल. यामुळे मुलांच्या कलागुणांना वाव मिळून विकास केला जाईल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **फिरते ग्रंथालय**

शहरातील लोकांसाठी फिरते वाचनालय उभारणे यात एक पुस्तक वाहन पूर्ण शहरात फिरवले जाईल एक दिवस एक ठिकाणी अश्या तत्वावर चालविले जाईल याची सुरुवात झोपडपट्टी क्षेत्रातील मुलांपासूल केली जाईल यामुळे वाचनवृत्ती वाढून त्यांचा ज्ञान संचय होईल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **आरोग्य नायक योजना**

या उपक्रमाद्वारे ठामपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वर्षातून दोनदा आरोग्य शिबीर घेण्यात येऊन विद्यार्थ्यांची आरोग्य प्रगती मोजली जाईल, त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याचे आरोग्यपत्र तयार केले जाईल व विद्यार्थ्यांना योग्य त्या सुचना देण्यात येतील. यामुळे मुलांचे आरोग्य प्रगती चांगली राहील व मुलांमध्ये आरोग्य विषयक जागरुकता वाढेल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **उच्च शिक्षण प्रवेश सहाय्यता केंद्र**

ठाणे शहरातील पदवीधर विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी देशातील नामांकीत महाविद्यालयात प्रवेश प्राप्त करण्यासाठी शिक्षण सहाय्यता केंद्र उभारले जाईल. ज्यात विद्यार्थ्यांना विविध महाविद्यालयाच्या प्रवेश परिक्षा पास करण्यायासाठी शिक्षण दिले जाईल. त्यासाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **ध्वनी रोधक भिंत**

ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात ध्वनिरोधक उभारले जाईल यामुळे रुग्ण आणि कर्मचारी यांना बाहेरील ध्वनीमुळे होणारा त्रास होणार नाही व त्यांना दिलासा मिळेल. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **डिजीटल मेसेज बोर्ड**

रुग्णालयात येणा-या रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णाची एक क्लीक वर माहिती मिळावी याकरीता ठामपाच्या छत्रपती शिवाजी

महाराज रुग्णालयात डिजीटल मेसेज बोर्ड लावण्यात येणार आहे. तसेच रुग्णालयाच्या अधिष्ठाता ही याची माहिती घेऊ शकतील. सदर उपक्रमामुळे रुग्णालयाची कार्यक्षमता वाढेल आणि येणा-या नागरिकांना फायदा होईल. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **नवजात शिशुसाठी दुध बँक**

नवजात बालकांना काही अपरिहार्य कारणास्तव मातेचे दूध न मिळाल्यास त्यांच्या पोषणाचा तसेच आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. अशा बालकांना दूध उपलब्ध व्हावे यासाठी ठाणे शहरातील नवजात शिशुंना योग्य वेळी मातृत्व दूध देण्यासाठी एक संपूर्ण मानवी दूध पेढी उभारली जाईल. ज्यामुळे शहरातील शिशुंना दूध मिळेल व शिशूंच्या आरोग्याला धोका होणार नाही. त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **डिजीटल साक्षरता उपक्रम**

इंटरनेट साथी या उपक्रमाम ठाणे शहरातील नागरिकांना स्मार्टफोन वापर आणि इंटरनेट साक्षरतेचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे नागरिक इंटरनेटचा योग्य वापर करुन विविध सरकारी तसेच खाजगी सुविधांचा वापर करु शकतील. ज्यचा उपयोग दैनंनि कामकाजात होईल. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **एक दिवस आयुक्तांसमवेत**

ठाणे शहरातील महाविद्यालयीन तरुण व तरुणींना महापालिका प्रशासन कसे काम करते हा अनुभव घेण्यासाठी सदरचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ज्यात तरुण तरुणींना आयुक्त तसेच विविध विभाग प्रमुख यांच्यासोबत एक दिवस घालवता येऊ शकतो. याचा फायदा स्पर्धा परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांना होईल. त्यासाठी **रु.२० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

- **डिजी लॉकर**

ठाणे महापालिका क्षेत्रातील नागरिकांना आपली विविध प्रमाणपत्रे जतन करुन ठेवण्यासाठी १ गिगाबाईटच्या मर्यादेत डिजीटल लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. याद्वारे महापालिकेस आवश्यक असलेली प्रमाणपत्रे नागरिकांना डिजी लॉकरद्वारे सादर करता येतील. त्यासाठी **रु.२० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

- **लिविंग लॅब**

विविध नागरी विषयात उद्‌भवणा-या समस्या आणि त्याचे उपाय यासाठी सदर लॅब उभारण्यात येणार असून लॅब मध्ये शोधले गेलेल्या विविध उपायांची चाचणी करण्यात येणार आहे. सदर लॅबद्वारे नागरिक, प्रशासन, खाजगी क्षेत्राला फायदा होणार असून याद्वारे नागरिक महानगरपालिकेस सामाजिक शैक्षणिक, तांत्रिक क्षेत्रात मदत करु शकतील. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **रंगीत झेब्रा क्रॉसींग**

नागरिकांनी झेब्रा क्रॉसींगचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले झेब्रा क्रॉसींग कृष्णधवल रंगात व रंगवता विविध रंग वापरले जातील. ज्यामुळे पादचारी त्याकडे आकर्षित होतील आणि त्याचा वापर करतील. त्यासाठी **रु. ५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

- **कौशल्य विकास कार्यक्रम**

वोकेशनल ट्रेनिग सेंटर द्वारे कुशल कामगार / उदयोजक निर्मिती करणे. याद्वारे ठाणे शहरातील गरजू लोकांना कौशल विकास ट्रेनिंग देणे शक्य होईल. सदरचा प्रकल्प सरकारी किंवा खाजगी भागीदारी तत्वावर सुरु करण्यात येईल. त्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **ॲडाप्टीव्ह ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टिम**

सध्याचे वाहतूक नियंत्रक हे पूर्व निर्धारित टायमरवर आधारित कार्यरत असून निर्धारित वेळेस वाहनांस व नागरिकांना चौक ओलांडता येतो. ठाणे शहराचे नागरीकरण मोठया प्रमाणात होत असल्याने वाहनांच्या संख्येत सुध्दा लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे विविध चौकात वाहनांची घनतेनुसार व Real time basis वर optimum time वर वाहतूक नियंत्रकांचे संचलन होणे आवश्यक आहे. सदर कार्यकमांतर्गत अस्तित्वात असलेल्या २७ चौकातील व नविन प्रस्तावीत २३ चौकात वाहतूक यंत्रणेकरीता Adoptive Traffic Control System यंत्रणा बसविणे व अनुषंगिक बाबींची उभारणी करुन सदर यंत्रणेला वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्ष व हजुरी येथील शहराच्या मुख्य नियंत्रण व संचलन केंद्र सोबत जोडणी करण्यात येणार आहे. त्यासाठी रु.३२ कोटी खर्च अपेक्षित असून सन २०१९-२० मध्ये रु.८ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

- **वैद्यकीय चिकीत्सा केंद्र**

 ठाणे शहरातील नागरिकांना वैद्यकीय चाचणी सोयी सुविधा सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध होण्यासाठी शहरातील विविध वैद्यकीय लॅब बरोबर संयुक्तपणे उपक्रम राबविण्यात येईल. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **शाळा आणि पालक संवाद योजना (डी.जी शाळा)**

 ठाणे महापालिकेच्या विविध शाळा आणि शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये योग्ग सुसंवाद राहण्यासाठी सदरचे एप्लिकेशन विकसित केले जाईल. ज्यामुळे पालकांना त्यांच्या पाल्याची प्रगती, सरुक्षा याबाबत माहिती मिळेल. त्यासाठी **रु.१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **अंधांसाठी कौशल्य विकास योजना**

 ठाणे शहरात असणा-या अंध व्यक्तींसाठी विशेष कौशल्य विकास योजना राबविण्यात येणार असून ज्याद्वारे त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण मिळेल. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **नवजात शिशु उपचार केंद्र (Neonetal Intensive Care Unit)**

 ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये दोन प्रसुतिगृहामध्ये प्रसुति पश्चात नवजात बालकांसाठी आरोग्य सेवा (आंतररुग्ण) सुरु करण्यात येत आहे. या अंतर्गत कमी दिवसांची अथवा कमी वजनाची बालके जन्म घेतील अशा बालकांसाठी एन.आय.सी.यु. उपलब्ध करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करुन या बालकांवर उपचार करणे शक्य होईल. यासाठी सुविधा तयार करुन सदरची केंद्रे पीपीपी तत्वावर खाजगी तज्ञाच्या सहभागातून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **मोहल्ला क्लिनिक (Wellness Clinic)**

 सदरील लोकांना त्यांचे परिसरात आरोग्य केंद्र सुरु केल्यामुळे घराजवळ आरोग्य सुविधा प्राप्त होईल. ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये असणा-या झोपडपट्टयांमध्ये व मध्यमवर्गीय लोकसंख्या मोठया प्रमाणात आहे अशा भागात Wellness Clinic सुरु करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. Wellness Clinic सुरु केल्याने शहरातील मध्यवर्गीय व गरिब नागरिकांच्या आरोग्यामध्ये सुधार होऊन तसेच क्षयरोग, मलेरिया, डेंग्यु, हिवताप इ. संसर्गजन्य व इतर साथीच्या

रोगांचे त्वरीत निदान होण्यास मदत होणार आहे. त्यासाठी **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **औषधी भांडार :**

ठाणे महानगरपालिकेमार्फत रुग्णांना औषधांचा पुरवठा नाममात्र दरामध्ये करण्यात येतो.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व लोकमान्य टिळक रुग्णालय कोरस या दोन्ही रुग्णालयांमध्ये पीपीपी च्या माध्यमातून औषधांची दुकाने सुरु करण्याचे प्रस्तावित आहे, उपलब्ध असलेली औषधे ही बाजारभावापेक्षा कमी दरात व योग्य दर्जाची उपलब्ध होतील याबाबत खबरदारी घेऊन ही औषधी दुकाने सुरु करण्याचे नियोजीत आहे. त्यासाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **रक्त कर्करोग उपचार :**

थेलसिमिया या रोगामध्ये रुगणांच्या रक्तातील पेशींची ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता कमी झाल्याने सदर रुग्णांच्या शरिरातील Red Blood Cells नष्ट होऊन सदर रुग्णास ॲनिमिया होण्याची शक्यता असते. अशावेळी सदर रुग्णास वेळोवेळी अतिरिक्त रक्त पुरवठा करणे (Blood Transfusion) आवश्यक असते. तसेच कर्करोग झालेल्या रुग्णांना उपचार म्हणून केमोथेरपीची सुविधा आवश्यकता असते.

या उपचारा दरम्यान रुग्णाला सर्वसाधारणपणे एखादा दिवस रुग्णालयात दाखल करुन घेणे (Day Care) आवश्यक असते. तसेच सदरचे उपचार सतत घेणेदेखील गरजेचे असते. यासाठी येणारा खर्च हा जास्त प्रमाणात असल्याने सर्वसाधारण मध्यमवर्गीय आणि गरीब कुटूंबाच्या आवाक्याबाहेरील असतो. त्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

- **जेष्ठ नागरिक वैद्यकीय सुविधा :**

ठाणे महापालिका क्षेत्रात जेष्ठ नागरिकांची संख्या विचारात घेता, त्यांच्यामध्ये निर्माण विविध आजार व आरोग्य विषयक सर्वसाधारण तक्रारी विचारात घेता, एकाच ठिकाणी आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध केल्यास जेष्ठ नागरिकांना होणा-या विविध आजारांवर आवश्यक असणा-या सुविधा जसे, निदान व त्यावरील उपचार हे एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी

आवश्यक असणारी उपकरणे , साधने / साहित्य ही महापालिकेमार्फत खरेदी करावयाची असून सदरचे क्लिनिक हे पीपीपी च्या माध्यमातून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**परिवहन सेवा**

परिवहन उपक्रमासाठी नागरी परिवहन निधी, संचलन तूट, स्वयंचलित बस सफाई यंत्रणा व प्रशासकीय इमारत दुरुस्ती यासाठी एकूण **रु.१३२ कोटीची** तरतूद प्रस्तावित आहे.

परिवहन सेवेच्या ताफ्यामध्ये खास महिलांसाठी ५० तेजस्विनी बसेस मार्च २०१९ अखेर दाखल होत आहेत. त्यामुळे महिला प्रवाशांना विशेष सेवा प्राप्त होणार आहे.

**इतर शासकीय विभागांसोबत करावयाचे महत्वाकांक्षी प्रकल्प MMRDA समवेतचे प्रकल्प :-**

**ठाणे खाडी लगत कोस्टल रोड विकसित करणे (साकेत ते गायमुख कोस्टल रोड )**

कोस्टल रोड MMRDA च्या माध्यमातून विकसित करणेबाबत कार्यवाही सुरु असून नवीन CZMP नुसार काही क्षेत्र CRZ विरहित होणार असल्यामुळे सदर प्रकल्पाची किंमत कमी होणार आहे. त्यानुसार नव्याने प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम ठाणे महानगरपालिकेने हाती घेतले आहे.

- **फूट हिल रोड :**

ठाणे महानगरपालिका हद्दीमधील घोडबंदर रस्त्यावर होत असलेल्या वाहतूक कोंडीवर उपाय योजना करण्यासाठी पर्यायी रस्त्याची निर्मिती करण्याचे अनुषंगाने डी. पी. मधील प्रस्तावित श्रीनगर ते पातलीपाडा टप्पा क्रमांक १ व पातलीपाडा ते गायमुख टप्पा क्रमांक २ या सुमारे १४ कि.मी. लांब व ४० मी. रुंद रस्त्याचे बांधकाम २ टप्प्यामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे. सदरचा खर्च एमएमआरडीए/ महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या सहकार्याने तयार करणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचा रु. ८०० कोटी एवढा आहे. सदर कामासाठी पर्यावरण विषयक संबंधित शासकीय कार्यालयांच्या मान्यता मिळणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

- **नवीन ठाणे विकसित करणे आणि ग्रोथ सेंटर बनविणे :-**

उल्हास नदी पलीकडील खारबाव, पायगाव, पाये, शिलोत्तर आदी भागात नवीन ठाणे विकसित करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यास सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने शासनास प्रस्ताव सादर केला असून, MMRDA यांनी या क्षेत्रात "खारबाव ग्रोथ सेंटर" नियोजित केले आहे. त्यामुळे ठाणे महानगरपालिका व MMRDA यांचे संयुक्त विद्यमाने नवीन ठाणे विकसित करणेबाबत नियोजन करणेत येत आहे.

- **ठाणे खाडीवर गायमुख ते खारबाव नवीन उड्डाणपूल उभारणे :-**

उक्त उड्डाणपूल बनविण्याबाबत ठाणे महानगरपालिकेने प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. सदर पूल MSRDC च्या माध्यमातून बांधणी करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय झाला असून, या पूलामुळे वसई अलिबाग मल्टी मोडल कॉरीडॉर ठाणे महानगरपालिकेच्या माजिवडा- ओवळा भागास जोडला जाणार आहे.

- **कळवा - खारेगांव लिंक रोड विकसित करणे :-**

कळवा - खारेगांव लिंक रोड रस्त्याचे ५७% भागाचे संपादन ठाणे महानगरपालिकेतर्फे झालेले असून, सदर रस्ता तयार करणेस ठाणे महानगरपालिकेस आर्थिक सहाय्य करण्याबाबतचा प्रस्ताव MMRDA स्तरावर अंतिम मान्यतेकरिता आहे.

- **ठाणे जिल्ह्यातील कारागृह ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अन्य जागी स्थलांतरीत करणे :-**

ठाणे महानगरपालिकेच्या प्रस्तावाबाबत कारागृह अधिक्षक यांनी विस्तृत तपासणी करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा. तद्नंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल. असे शासनाने निर्देश दिले आहेत. त्या दृष्टीने नियोजन करणेत येत आहे.

- **म्हातार्डी बुलेट ट्रेन स्टेशन :-**

बुलेट ट्रेनचे ठाणे महानगरपालिका क्षेत्रात म्हातार्डी येथे स्टेशन प्रस्तावित असून सदरचा परिसर हा अद्याप विकसित नसल्याने या ठिकाणी पथदर्शी असे स्थानक परिसराचे नियोजन करणेबाबत जपानच्या "जायका" या संस्थेने तयारी दर्शविली असून, स्टेशनच्या परिसरातील पायाभूत सुविधा निर्माण करणेची जबाबदारी ठामपाने घेतली असून, त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

- **दिवा-आगासन डोंबिवली रस्ता विकसित करणे:-**

प्रस्तावित म्हातार्डी बुलेट ट्रेन स्टेशनपासून ६०.०० मी. विकास आराखड्यातील रस्ता हा आंतरशहरीय असल्याने महापालिका क्षेत्राबाहेरील २७ गावापर्यंत विकसित करणेस तसेच ऐरोली काटई रस्त्यास जोडण्याबाबत MMRDA आणि ठाणे महानगरपालिका यांचे स्तरावर विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु झाली असून, सदर रस्त्याचा खर्च MMRDA मार्फत होणार आहे.

- **कल्याण फाटा येथील उड्डाणपूल :-**

कल्याण फाटा येथील उड्डाणपूल MMRDA मार्फत बांधण्यात येणार होता. तथापि, बुलेट ट्रेनच्या आखणीमुळे सदर उड्डाणपूल रद्द करण्यात आला. तथापि, केवळ वाय जंक्शन येथून उड्डाणपूल बांधून वाहतूक कोंडीची समस्या सुटणार नसल्यामुळे कल्याण फाटा येथे ग्रेड सेपरेटच्या माध्यमातून वाहतूक समस्येवर मार्ग काढण्याकरिता MMRDA सोबत चर्चा करुन त्यावर तोडगा काढण्यात आला असून, ग्रेड सेपरेटरकरिता आवश्यक ते भूमीसंपादन डी.आर. / टि.डी.आर. च्या माध्यमातून ठाणे महानगरपालिका करुन देणार आहे. तसेच शिळ जंक्शन येथे उड्डाणपूल बांधणेबाबत MMRDA यांनी सहमती दर्शविली आहे.

- **ऐरोली काटई रस्ता :-**

MMRDA मार्फत बांधण्यात येणा-या ऐरोली काटई मार्गाचे संपादन डि.आर./टि.डी.आर च्या माध्यमातून करुन देण्यास ठाणे महानगरपालिकेने तयारी दर्शविली असून, सदर मार्गाच्या मुंबई - पुणे रस्त्यालगत असलेल्या भूखंडांचे संपादनही ठाणे महानगरपालिकेने करुन मुंबई- पुणे रस्त्यावरील उड्डाण पूलाचा मार्ग मोकळा केला आहे.

**एस.टी.महामंडळा समवेतचे प्रकल्प**

एस.टी. महामंडळाच्या कळवा आगाराच्या अतिरिक्त जागेवर सार्वजनिक सुविधा विकसित करणे आणि ठाणे स्टेशन लगतच्या एस.टी. महामंडळाच्या जागेवर सार्वजनिक सुविधा विकसित करणे कामी शासन स्तरावर अनुकुलता दर्शविण्यात आली असून, उक्त भूखंडाचे आरक्षण करण्याबाबतचा आणि विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत संमत झाला आहे. त्या दृष्टीने करणेत आलेले नियोजन एस. टी. महामंडळाने अंतिम केल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

ठाणे शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग व तहसिल कार्यालय यांचा एकत्रित पुनर्विकास करणे आणि कोपरी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निवासस्थानांचे पुनर्विकास करुन तेथे सार्वजनिक सुविधा उपलब्ध करणे.

वरील ठिकाणी एकत्रित पुनर्विकास करणेकामी शासन स्तरावर अनुकुलता दर्शविण्यात आली असून, उक्त भूखंडाचे आरक्षण करण्याबाबतचा आणि विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत संमत झाला आहे. हे सर्व भूखंड हे वर्दळीच्या ठिकाणी असून या ठिकाणी पार्किंगची समस्या आहे. वरील नियोजन यशस्वी झाल्यास स्टेशन, कळवा नाका, बाजारपेठ येथील पार्किंग समस्या दूर होण्यास मदत होऊन शासकीय विभागास अतिरिक्त बांधकाम क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल.

**आभार**

भारताचे माननीय पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील स्वच्छ भारत मिशन, अमृत योजना, स्मार्ट सिटी योजना, सर्वांसाठी घरे योजना, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना आणि अन्य योजनांच्या माध्यमातून ठाणे शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले आहे त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, ठाणे जिल्हयाचे मा.पालकमंत्री, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार, मा.मुख्य सचिव, मा.पालक सचिव, मा.आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA), नगर विकास विभागाचे मा.प्रधान सचिव व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव १ व २ तसेच मा. प्रधान सचिव (महसूल) तथा अध्यक्ष ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड व शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना सतत प्रोत्साहित करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा.गटनेते, सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका, सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

ठाणे शहरातील सर्व वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांचे पत्रकार, प्रतिनिधी यांनी महापालिकेच्या विविध योजनांना, धोरणांना सातत्याने सकारात्मक प्रसिध्दी देऊन सहकार्य केले त्याबद्दल त्यांचा विशेष आभारी आहे.

महानगरपालिकेच्या सर्व कामांच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभागी असलेले महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. राजेंद्र अहिवर, श्री. समीर उन्हाळे व सर्व विभागातील विभाग प्रमुख व अधिकारी आणि कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे मी आभार मानतो.

महानगरपालिकेचा अर्थसंकल्प अहोरात्र काम करुन तयार केल्याबद्दल मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. मनेष वाघीरकर, श्री. प्रदिप मकेश्वर, सौ.प्रतिभा निपुर्ते, श्री.रुपेश पाटगावकर व लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेही मी आभार मानतो.

सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्तावित केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणि धोरणांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.स्थायी समितीस सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

खालील शेरसह माझे निवेदन संपवितो.

अभी तो चंद लफ्जो में
समेटा है मुझे मैने
अभी तो मेरी किताबों में
तेरी तस्वीर बाकी है ।।

धन्यवाद.

**! जय हिंद !**

**संजीव जयस्वाल**
**महापालिका आयुक्त**